# मराठी विश्वकोश



परिचय ग्रंथ

साहित्य आणि संस्कृति मंडळ
महाराष्ट्र राज्य

# मराठी विश्वकोश

परिचय ग्रंथ

# मराठी विश्वकोश

## परिचय-ग्रंथ


प्रमुख संपादक

**लक्ष्मणशास्त्री जोशी**



१९६५

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ

मुंबई

प्रकाशक :
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ
५ वा मजला, सचिवालय, मुंबई ३२

मुद्रक :
विष्णु पुरुषोत्तम भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४

सजावट, वेष्टन आणि विशेष-चित्रमुद्रण :
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
चर्नीरोड गार्डन्स्, मुंबई ४

२ एप्रिल १९६५
(गुढी पाडवा)

© सर्व हक्क महाराष्ट्र शासनाने स्वाधीन ठेवले आहेत.

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ

महाराष्ट्र राज्याचे पहिले व माजी मुख्यमंत्री श्री० यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळीं राज्यकारभारासंबंधीची मूलभूत धोरण सूचित करणारी काही सूत्रे सांगितली. त्या सूत्रांच्या अनुसाराने मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्ध्यर्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाची स्थापना दिनांक १९ नोव्हेंबर, १९६० ला झाली. या मंडळाने प्रारंभीच खालील कार्यक्रम हाती घेतला असून तो कार्यान्वितही केला जात आहे. हा कार्यक्रम असा :

१. मराठीमध्ये एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाप्रमाणे सर्वसंग्राहक विश्वकोश संपादित करून प्रकाशित करणे. या विश्वकोशाचे ब्रिटानिकाच्या आकाराच्या प्रत्येकी १,००० पृष्ठांचे १९ खंड संकल्पित केले आहेत;
२. अद्यावत कागदपत्रांचा उपयोग करून अंदाजे प्रत्येकी ५०० पृष्ठांच्या ५ खंडांत महाराष्ट्राच्या इतिहासाचे संपादन आणि प्रकाशन करणे;
३. मराठी बोलभाषांचा शास्त्रीय अभ्यास करून त्या बाबतीत माहिती प्रकाशित करणे;
४. अन्य भारतीय आणि प्रमुख परदेशी भाषांच्या अभ्यासाची साधने द्विभाषिक शब्दकोश, भाषाप्रवेश आणि वाचनपाठमाला या त्रिविध स्वरूपांत मराठी भाषिकांना उपलब्ध करून देणे;
५. मराठीत अन्य भाषांतील उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित करून मराठी वाङ्मयाच्या समृद्धीस मदत करणे;
६. शास्त्रीय आणि तांत्रिक विषयांवर त्याचप्रमाणे सामाजिक शास्त्रे आणि मानव्यविद्या या विषयांवर विचारपूर्ण अशा सुटसुटीत ग्रंथांची निर्मिती करणे;
७. विद्वान लेखक व प्रतिष्ठित संशोधन संस्था यांचे लेखन वा संशोधन प्रकाशित करण्यासाठी अनुदान देणे.

वरील कार्यक्रमांपैकी विश्वकोशाचा परिचय-ग्रंथ सोबत प्रसिद्ध होत आहे. महाराष्ट्रेतिहासाच्या संपादनाचेही काम काही विद्वानांकडे सोपविले आहे. मराठी बोलभाषांपैकी दक्षिण कर्नाटकातील कोंकणीचे अध्ययन पूर्वीच प्रकाशित झाले आहे. कुडाळी बोलीचे अध्ययन लवकरच प्रसिद्ध होईल. यानंतर क्रमाने रत्नागिरीची 'कुणबी' आणि गोव्याची 'खिश्चन कोकणी' यांचीही अध्ययने प्रसिद्ध होतील. याशिवाय अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे आंतरभारतीच्या अध्ययनाचा होय. उर्दू–मराठी, गुजराथी–मराठी व कानडी–मराठी या शब्दकोशांच्या मुद्रणप्रती तयार झाल्या असून उर्दू–मराठी शब्दकोश मुद्रित झाला आहे व तो लवकरच प्रकाशित होईल. तामिळ, मराठी, बंगाली, कानडी व मल्याळम् या भाषांच्या भाषाप्रवेशांच्या मुद्रणप्रतीही तयार झाल्या आहेत. तामिळ–मराठी, बंगाली–मराठी, व मल्याळम्–मराठी शब्दकोशांचे काम विद्वानांकडे सोपविले आहे. उत्कृष्ट ग्रंथांच्या भाषांतराच्या योजनेखाली कै० न्यायमूर्ती म० गो० रानडे यांच्या 'Rise of the Maratha Power' या उत्कृष्ट ग्रंथाचा प्रा० न० र० फाटक यांनी केलेला अनुवाद मंडळाने आधीच प्रकाशित केला आहे. म० म० पां० वा० काणे यांच्या धर्मशास्त्राचा इतिहास हा इंग्लिशमधील ग्रंथ मराठीत संक्षिप्त रूपात तयार झाला आहे. पुणे येथे भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या संशोधित महाभारत आवृत्तीचे मराठी भाषांतर पूर्ण होत आले आहे. आणि ऋग्वेदाचे सविवरण मराठी भाषांतर अर्धे तयार झाले आहे. फ्रेंच भाषेतील वर्णलेखन शास्त्रावरील एक उत्कृष्ट ग्रंथ मराठी भाषांतराकरिता विद्वानांकडे सोपविला आहे. मराठीत विज्ञानमाला या सदराखाली विज्ञान व तंत्रसंबंधी लिहिलेली पुस्तके प्रकाशित करण्याचा कार्यक्रमही चांगल्या रीतीने कार्यान्वित होत असून विज्ञानमालेतील आरोग्य व आहार, मानवी आनुवंशिकता, देशनांक–निर्देशांक, ही पुस्तके प्रकाशित झाली असून मानवी मेंदु व त्याचे कार्य, प्राणिसृष्टी, स्थापत्यशिल्पविज्ञानकोश, आयुर्वेदकोश इत्यादी पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर असून त्यांतील काहींचे मुद्रण समाप्त झाले आहे व काहींचे मुद्रण सुरू झाले आहे. याशिवाय मंडळाच्या अनुदानाने निरनिराळ्या विषयांवर आजपर्यंत १२५ हून अधिक ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. विशेषतः स्वामी विवेकानंद यांच्या जन्मशताब्दिनिमित्त प्रसिद्ध झालेल्या समग्र ग्रंथांना मंडळाकडून अनुदान देण्यात आले आहे. येथे नमूद करण्यासारखी अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी की, कै० हरी नारायण आपटे यांच्या जन्मशताब्दिनिमित्त त्यांची दुर्मिळ पुस्तके प्रसिद्ध करण्याकरिता आपटे यांच्या ग्रंथांचा प्रकाशनाधिकार असलेल्या पुणे येथील आर्यभूषण मुद्रणालयास ६० टक्के प्रकाशन खर्च देण्यात आला असून या अनुदानाच्या आधारावर आपटे यांची अनेक दुर्मिळ पुस्तके त्वरेने प्रकाशित होत असून हा प्रकाशन कार्यक्रम येत्या वर्षाअखेर पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ**

*अध्यक्ष*

तर्कतीर्थ श्री० लक्ष्मणशास्त्री जोशी

*सदस्य*

प्रा० न० र० फाटक

म० म० डॉ० वा० वि० मिराशी

डॉ० पु० म० जोशी

डॉ० दि० धों० कर्वे

प्रा० गोवर्धन पारीख

डॉ० अ० मा० घाटगे

प्रा० वा० ल० कुलकर्णी

श्री० बापूराव नाईक

सचिव, शिक्षण व समाजकल्याण विभाग
महाराष्ट्र राज्य, मुंबई

शिक्षणसंचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

*सदस्य-सचिव*

श्री० सेतु माधवराव पगडी

# मराठी विश्वकोश

*प्रमुख संपादक*
**लक्ष्मणशास्त्री जोशी**

*प्रभारी विभागसंपादक*
**क० वा० केळकर**, विज्ञान व तंत्रविद्या कक्षा
**सदाशिव आठवले**, मानव्यविद्या कक्षा

*चित्रसंपादक*
**ज० द० गोंधळेकर**

# मराठी विश्वकोश

## परिचय-ग्रंथ

## अनुक्रमणिका


संपादकीय निवेदन

१. विश्वकोशाचे स्वरूप १– २८

२. नमुन्याच्या नोंदी २९– ९३

३. पारिभाषिक शब्दसंग्रह ९५–११२

४. सूची ११३–१२१

# संपादकीय निवेदन

मराठी विश्वकोशाचा हा परिचय ग्रंथ वाचकांना सादर करण्यास आम्हास आनंद होत आहे.

मराठीमध्ये मानव्यविद्या आणि विज्ञान व तंत्र या विषयांवर एवढ्या व्यापक प्रमाणात विश्वकोश निर्मितीचा हा पहिलाच प्रयत्न आहे. पश्चिमी देशांत ब्रिटानिका, अमेरिकाना, कोलीयर्स, चेंबर्स इत्यादी विश्वकोश निर्माण करण्याची शेकडो वर्षे परंपरा चालू आहे, त्यामुळे विश्वकोश-निर्मितीची पद्धती दीर्घकालीन अनुभवाने तिकडे परिणतावस्थेस पोचली आहे. तिकडे ज्ञानविज्ञानांचा विकास शेकडो वर्षे होत असल्यामुळे तिकडे विविध विश्वकोशासारख्या संदर्भग्रंथांच्या गरजाही मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. आपल्या इकडे ज्ञानविज्ञानाचा विकास मोठ्या प्रमाणात अजून व्हावयाचा आहे, त्यामुळे विश्वकोशासारख्या संदर्भग्रंथांच्या गरजेचे स्वरूपही काही अर्थी निराळे आहे. ज्ञानविज्ञानांची नवी नवी परिभाषा कशी वापरावी आणि ज्ञानविज्ञानांतील विविध विषय कशा रीतीने व्यक्त करावेत अशा प्रकारची आपली ही पहिली व मूलभूत गरज आहे. अशी गरज पश्चिमी भाषांना राहिली नाही. कारण विकासक्रमाने दीर्घकालपर्यंत ज्ञानविज्ञानांची मांडणी होत असल्यामुळे पारिभाषिक शब्द आपोआप तिकडे रूढ झाले आहेत व नव्या नव्या परिभाषा स्वाभाविक रीतीने व्यवस्थित व निश्चित क्रमाने तिकडे वाढीस लागल्या आहेत; त्यामुळे विषय योग्य परिभाषा वापरून व्यक्त करण्याची शैली पश्चिमी भाषांमध्ये दृढमूल झाली आहे आणि त्यामुळे पश्चिमी परिभाषांना अर्थघनता व विशदार्थता प्राप्त झाली आहे. भारतीय भाषांमध्ये ज्ञानविज्ञानांची मांडणी अत्यल्प प्रमाणात झाली असल्यामुळे मांडणीच्या अगोदरच परिभाषा–कोशांच्या निर्मितीचे कार्य होत आहे. विचारांच्या भाषेत न वापरलेले शब्द केवळ शब्दकोशात ग्रथित केल्याने जवळजवळ अर्थशून्य राहतात. ही परिभाषांची अर्थशून्यता वाक्यात वापरूनच कमी होत जाऊन नाहीशी होते. नवी परिभाषा नव्याने जास्त प्रमाणात वापरल्यास वाक्ये बोजड होतात. तो बोजडपणा वाक्यांमध्ये दीर्घकालपर्यंत वापरल्यानेच कमी होतो व पारिभाषिक शब्द अर्थघन व चमकदार बनू लागतात. आम्ही या विश्वकोशात सामाजिक व भौतिक विज्ञानांतील विषयांवर मोठ्या प्रमाणात विविध पारिभाषिक शब्द वापरणार आहोत याची कल्पना या परिचय-ग्रंथावरून वाचकांस येईल.

या परिचयग्रंथातील प्रस्तावनेवरून विश्वकोशरचनेचे स्वरूप व त्यातील विषयोपविषयांची रूपरेषा कळून येईल. त्यांतील विविध शीर्षकाखाली आलेल्या लेखांवरून विश्वकोशातील विवेचनपद्धतीचे व शैलीचे स्वरूप ध्यानात येईल. विशिष्ट विषयावरील ग्रंथातील प्रकरणात वा नियतकालिकात वा निबंधात ज्या प्रकारची लेखनशैली आणि लेखनव्यवस्था असते त्यापेक्षा विश्वकोशातील लेखांची शैली व व्यवस्था निराळ्या प्रकारची असते, याची कल्पना यातील लेखांवरून येईल. त्याच्या अखेर दिलेला पारिभाषिक शब्दकोश आणि शब्दसूची यांवरून विश्वकोशाचा उपयोग कसा करावा याची कल्पना येईल.

निरनिराळ्या क्षेत्रांतील विद्वान व इतर वाचकवर्ग यांची मते व अभिप्राय मिळवून त्या मतांवरून व अभिप्रायांवरून, यथोचित सुधारणा करण्यास मार्गदर्शन व्हावे असा हा परिचय-ग्रंथ प्रकाशित करण्याचा मुख्य हेतू आहे. त्यामुळे विश्वकोशाच्या लेखकांना व समीक्षक संपादकांना आपल्या कार्याची निश्चित कल्पना येईल व विशेषतः कार्यालयीन कार्यकर्त्यांनाही प्रशिक्षण मिळेल.

विश्वकोशाच्या संपादनाच्या कामी आम्हांस अनेक महाराष्ट्रीय व अन्य विद्वानांचे सहकार्य मिळत आहे. जपान, जर्मनी, डेन्मार्क वगैरे देशांच्या भारतातील दूतावासांकडून त्या त्या देशातील भाषा, साहित्य व कला यांसंबंधी लेखनाचे सहकार्य मिळू लागले आहे. उदाहरणार्थ, या परिचय-ग्रंथातील फिनलंड संबंधीची नोंद व नकाशा यांचा संपूर्ण हक्क फिनिश दूतावासाने आम्हास दिला आहे, ही विशेष उल्लेखनीय गोष्ट होय. भारतातील अन्यभाषिक प्रदेशातीलही म्हणजे कर्नाटक, पंजाब इत्यादी ठिकाणच्या विद्वानांकडून भाषा, साहित्य इत्यादी विषयांवरील लेखांचे साहाय्य मिळू लागले आहे ही विशेष उत्साहकारक गोष्ट होय. त्या त्या प्रदेशातील व राष्ट्रातील भाषा, साहित्य, कला व संस्कृती यांसंबंधी त्या प्रदेशातील व राष्ट्रातील तज्ज्ञांनी केलेले विवेचन अधिक बिनचूक असण्याचा संभव असतो म्हणून अशा सहकार्याचे मोल अधिक आहे. म्हणून या गोष्टीचा आम्ही येथे कृतज्ञतापूर्वक निर्देश करतो.

विश्वकोश कार्यालय, वाई
दिनांक, २ एप्रिल १९६५
गुढी पाडवा
चैत्र शुद्ध १, शके १८८७

**लक्ष्मणशास्त्री जोशी**
प्रमुख संपादक; मराठी विश्वकोश

# विश्वकोशाचे स्वरूप

# विश्वकोशाचे स्वरूप

**विश्वकोश** हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने हाती घेतलेले महाराष्ट्र शासनाचे महान कार्य आहे. अन्य भाषांतील निरनिराळ्या विषयांवरील उत्तम पुस्तकांची मराठीत भाषांतरे वा रूपांतरे करविणे, शास्त्रीय, वैज्ञानिक वा अन्य बौद्धिक महत्त्व असलेल्या स्वतंत्र ग्रंथांचे प्रकाशन करणे आणि तशा तऱ्हेची लेखन–प्रकाशने करणाऱ्या योग्य व्यक्तींना व संस्थांना अनुदाने देणे अशी बहुविध कामे हे मंडळ करीत आहे आणि विश्वकोश हे त्याचे एक प्रधान कार्य आहे.

मराठीमध्ये एका चांगल्या विश्वकोशाची किती आवश्यकता आहे हे विस्ताराने सांगावयास नको. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका किंवा एन्सायक्लोपीडिया अमेरिकानासारखा सर्वसंग्राहक आणि अद्यावत माहिती देणारा एकही संदर्भग्रंथ आज मराठीत नाही. तशा तऱ्हेचे पुष्कळ प्रयत्न झालेले आहेत. कित्येक विद्वानांनी अत्यंत बिकट परिस्थितीत आणि अतिशय अपुऱ्या साधनांनिशी या स्वरूपाची काही कामे केलेली आहेत. तरीही एका विस्तृत आणि अधिकृत स्वरूपाच्या संदर्भग्रंथाची गरज शिल्लक आहे. म्हणूनच महाराष्ट्र शासनाने हे काम हाती घेतले आहे. एखाद्या व्यक्तीने किंवा खाजगी संस्थेने अशा तऱ्हेचे काम करावयाचे म्हटले तर त्याला स्वाभाविकपणे ज्या मर्यादा पडतात त्या लक्षात घेऊनच शासनाने सर्व क्षेत्रांतील विद्वान माणसे एकत्र आणून आणि या कामासाठी लागणारे संघटनात्मक व आर्थिक प्रश्न सोडवून व त्यासंबंधी शक्य तेवढी चांगली व्यवस्था लावून हे काम स्वतः हाती घेतले आहे.

आज विश्वकोशाची गरज अनेक कारणांनी निर्माण झाली आहे. स्वतंत्र भारतात शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होत आहे. विद्या ही आता काही वर्गांची वा जातींची मक्तेदारी राहिलेली नाही. समाजाच्या सर्व थरांतील सर्व व्यक्तींचा शिक्षणाचा अधिकार मान्य झाला आहे. बहुजनसमाजातील नवी पिढी ज्ञानक्षेत्रात आत्मविश्वासाने वावरू लागली आहे. आणि म्हणूनच लोकांना त्यांच्या मातृभाषेतून ज्ञानविज्ञान पुरविण्याची निकड निर्माण झाली आहे. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे तर राज्यातील बहुतेक विद्यापीठांनी उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीचाही स्वीकार केला आहे. तथापि ज्यांतून निरनिराळ्या विषयोपविषयांतील सूक्ष्म ज्ञान विद्यार्थ्याला मिळू शकेल अशी दर्जेदार पुस्तके मात्र मराठीत नाहीत. मराठी माध्यम झाल्यामुळे विद्यापीठाच्या क्षेत्रातील प्राध्यापकांनी असंख्य क्रमिक व परीक्षोपयोगी पुस्तके लिहून तयार केली आहेत. त्यांतील कित्येक चांगलीही आहेत. तथापि कोणत्याही ज्ञानशाखेतील कोणत्याही विषयावर मान्यवर असे अनेक ग्रंथ मराठीत आहेत असे निर्विवादपणे म्हणता येणार नाही. तशा ग्रंथांची गरज अंशतः भागावी व विविध विषयांवर समृद्ध ग्रंथ निर्माण व्हावयाच्या कार्यास चालना मिळावी हा हेतू विश्वकोशाच्या द्वारा साध्य होण्यास काहीच हरकत दिसत नाही. कारण या विश्वकोशात अद्ययावत ज्ञानविज्ञानाच्या प्रमुख अशा सर्व शाखांचा समावेश केल्यामुळे व प्रत्येक विषयाच्या सामान्य, मूलभूत व विशिष्ट कल्पनांचे विवरण व तत्संबंधी पारिभाषिक शब्दांचा उपयोग केल्यामुळे प्रत्येक विषयावरील नवीन ग्रंथनिर्मितीचा मार्ग अधिक सुगम होऊ शकेल. विद्यापीठांच्या बाहेरील अभ्यासकांनाही विश्वकोशाचा उपयोग होईलच.

स्वतंत्र भारतात मध्यवर्ती शासनाचा व राज्यशासनाचा कारभार भारतीय भाषांतून होणे हेही आता अटळच आहे. महाराष्ट्र शासन मराठीचा राज्यभाषा म्हणून स्वीकार करीत आहे. नवे राज्यकर्ते, नवे शासकीय सेवक हे सर्व लोकशाही भारतात अधिकाधिक लोकाभिमुख होत जाणार आहेत. म्हणून राज्यव्यवहाराची भाषा ही जितकी सुगम पण समृद्ध होईल तितकी हवी आहे. महाराष्ट्र शासनाने तयार केलेल्या पदनामकोशासारख्या ग्रंथामुळे शासनाची एक तांत्रिक गरज

भागली जाईल; परंतु त्याहूनही व्यापक स्वरूपाची ग्रंथनिर्मिती होऊन मराठी ही खऱ्या अर्थाने राज्यव्यवहाराची किंवा लोकव्यवहाराची भाषा होईल असे प्रयत्न झाले पाहिजेत. विश्वकोशाने हेही अंशतः साधेल.

अर्थात अशाही परिस्थितीत इंग्रजीसारख्या भाषेकडे पाठ फिरवून चालणार नाही. ते आत्मघातकीपणाचे होईल. निरनिराळ्या क्षेत्रांतील आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी, विद्येच्या क्षेत्रात नवनव्या कल्पनांच्या व शोधांच्या देवघेवीसाठी कोणत्या तरी एका जागतिक, उन्नत ज्ञानभाषेचा आसरा घ्यावाच लागेल. कोणत्याही भारतीय भाषेला इंग्रजी, जर्मन, फ्रेंच किंवा रशियन भाषेएवढा दर्जा प्राप्त करून देणे नजीकच्या भविष्यकाळात तरी अशक्य आहे, अव्यवहार्यही आहे. तेव्हा मराठीमध्ये मोठमोठे ग्रंथ किंवा विश्वकोश निर्माण केले म्हणजे इंग्रजीसारख्या विश्वभाषेशी घटस्फोट घेतला असा अर्थ होत नाही, होऊ नये. एवढेच नव्हे, तर अशा प्रयत्नांमुळे इंग्रजीसारख्या उन्नत ज्ञानभाषेतील उच्च कल्पना व उच्च विचार सुशिक्षित मराठी वाचकास अधिक चांगल्या पद्धतीने आकलन करण्याची पात्रताही प्राप्त होईल. अर्थात कोणत्याही परिस्थितीत इंग्रजी येत नसेल तर जिज्ञासूंना ज्ञानाची वाटच बंद व्हावी ही परिस्थिती मात्र राहता कामा नये, आणि हळूहळू सर्व प्रकारचे उच्च आणि सूक्ष्म ज्ञानसुद्धा मराठीतून मिळवता यावे अशी स्थिती निर्माण झाली पाहिजे. त्यासाठीच हा विश्वकोशाचा प्रपंच आहे.

प्रस्तुत मराठी विश्वकोश हा सर्वसामान्य शिक्षितांसाठी व साधारणतः महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या किंवा त्या पातळीच्या वाचकांसाठी मानव्यविद्या आणि विज्ञान व तंत्र यांतील विषयोपविषयांवरील एक चांगला संदर्भग्रंथ म्हणून उपयुक्त ठरावा अशी अपेक्षा आहे. अर्थातच निरनिराळ्या विषयांतील आजपर्यंतच्या अभ्यासाचे सार येथे दिले जाईल. सर्व विषयांतील सर्व सिध्दांतांचा, तत्त्वांचा आणि विचारप्रवाहांचा स्थूल असा आढावा कोशात यावा अशी आयोजना आहे आणि त्याचबरोबर काही पृष्ठांच्या मोठ्या व्याप्तिलेखांपासून काही शब्दांच्या लहान नोंदी, त्यांचे पूरक संदर्भ आणि संदर्भग्रंथांच्या याद्या यांवरून एखाद्या जिज्ञासू अभ्यासकाला विशिष्ट विषयाच्या विशेष अभ्यासासाठीही बरेचसे मार्गदर्शन व्हावे अशीही दृष्टी ठेवण्यात येईल. अधिक सखोल अभ्यासाच्या हेतूने केलेल्या नोंदी तसेच अतिशय तांत्रिक स्वरूपाच्या नोंदी, ह्या वर उल्लेखिलेल्या पातळीवरच्या वाचकाला समजतीलच असे नाही; गणितातील व विज्ञानातील अवघड प्रमेये किंवा विश्वरचनाविषयक निरनिराळे सिद्धांत, अभिप्रेत असलेल्या वाचकाच्या आवाक्यातील असणार नाहीत. तथापि सर्वसंग्राहक कोशात त्यांचा अंतर्भाव व्हायलाच पाहिजे. काही वाचकांना तरी त्यांचा उपयोग आहेच आणि कालांतराने व्यापक शिक्षण घेतलेल्या भावी वाचकांना त्यांचा अधिकाधिक प्रमाणात लाभ घेता येईल.

कोशरचनेच्या अनेक पद्धती आहेत. काही कोश फक्त विशिष्ट विषयांपुरतेच असतात. त्यातही काही त्या विषयाचे निरूपण प्रकरणशः करतात, तर काही अकारविल्हे नोंदी लिहून करतात. 'एन्सायक्लोपीडिया ऑफ हेल्थ अँड फिजिकल कल्चर' (मॅकफॅडन) हा कोश त्या विशिष्ट विषयापुरता असून त्याची रचना त्या विषयावरील एखाद्या ग्रंथासारखीच आहे. म्हणजे त्यात सुसंगतपणे विषय सांगण्यासाठी सोईस्कर अशी प्रकरणे पाडून सर्व मांडणी केलेली आहे. मात्र मॅक्ग्रॉहिलचा 'एन्सायक्लोपीडिया ऑफ सायन्स अँड टेक्नालॉजी', ऑडेलचा 'एन्सायक्लोपीडिया ऑफ स्पेस सायन्स' आणि सेलिगमनचा 'एन्सायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सेस' हे कोश विशिष्ट विषयांसाठी असूनही अकारविल्हे नोंदी लावून रचलेले आहेत. दुसऱ्या प्रकारचे कोश हे सर्वविषयसंग्राहक अशा स्वरूपाचे असतात. यातही 'ऑक्सफर्ड ज्यूनिअर एन्सायक्लोपीडिया' सारखे काही कोश ज्ञानाच्या सर्व शाखोपशाखांची माहिती विषयवार व प्रकरणशः देतात. तर 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका' सारखे कोश सर्व विषयांची माहिती अकारविल्हे नोंदी लिहून देतात. या सर्व प्रकारच्या कोशांना विशिष्ट वाचक अभिप्रेत असतात व त्या त्या कोशाची संदर्भसाहाय्य म्हणून जी उपयुक्तता असते ती निरनिराळ्या दृष्टिकोनांतून ठरविलेली असते. उदाहरणार्थ, 'वर्ल्ड बुक

एन्सायक्लोपीडिया' हा पाश्चात्य देशांतील माध्यमिक विद्यालयांच्या शिक्षणाचे सर्व विषयांचे व्यापक साधन म्हणून रचला आहे. माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षकांनी त्याचा उपयोग करावा असा त्याचा मुख्य उद्देश आहे, म्हणून आपापल्या विषयोपविषयांची या कोशात कोठे कोठे माहिती आलेली आहे याचे मार्गदर्शन करणाऱ्या साहाय्यपुस्तिकाही 'वर्ल्ड बुक एन्सायक्लोपीडिया'च्या संपादक कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे मुलांसाठी ओढॅमच्या 'एन्सायक्लोपीडिया फॉर चिल्ड्रेन'सारखे मोठ्या अक्षरांतले व भरपूर रंगीत चित्रांचे कोशही असतात; तर मल्लालसाकेराच्या 'डिक्शनरी ऑफ पाली प्रॉपर नाउन्स' किंवा क्लार्कच्या 'एन्सायक्लोपीडिया ऑफ एक्स-रेज अँड गॅमा-रेज'सारखे कोशग्रंथ मुख्यतः फक्त त्या त्या विशिष्ट क्षेत्रातल्या पंडितांनाच उपयोगी पडण्यासारखे असतात.

प्रस्तुत मराठी विश्वकोश हा सर्वविषयसंग्राहक स्वरूपाचा असून अकारविल्हे रचिला जाणार आहे. मराठीची सांप्रतची स्थिती लक्षात घेता विषयवार स्वतंत्र कोश तयार होण्यासाठी अजून थोडा काळ जाणे आवश्यक आहे. सर्वसंग्राहक कोशरचनेतून विषयकोश हळूहळू उद्भवतील. प्रस्तुत विश्वकोश अकारविल्हे रचण्याचे ठरविले आहे. त्यातील दृष्टी अशी की, विषयवार व प्रकरणशः रचलेल्या कोशामुळे सर्वसामान्य सुशिक्षित माणसाचा सर्व विषयांशी संबंध आणण्याचा हेतू साधत नाही. कारण फक्त आपल्या विषयाचा कोश उघडून पाहणारा इतर विषयांपासून दूर राहतो. सर्वसामान्य माणसाला सर्व ज्ञानक्षेत्रांत शिरता यावे म्हणूनच ही अकारविल्हे कोशरचनेची कल्पना योजिली आहे. अकारविल्हे किंवा प्रकरणवारी अशा विशिष्ट विषयांच्या कोशांनाही महत्त्व आहेच. आज ज्ञानाच्या प्रत्येक शाखोपशाखेचा अपरिमित विस्तार झाला आहे. एका सर्वसंग्राहक कोशाला आवरता येणार नाही इतकी संशोधनात्मक व चर्चात्मक ज्ञानाची वाढ होत आहे. म्हणूनच पाश्चात्य जगात आता अशा सर्वसंग्राहक कोशांचे युग संपले आहे असे मानण्यात येऊ लागले आहे ते चूक म्हणता येणार नाही. तथापि इंग्रजीसारख्या ज्या विकसित भाषेत अनेक व्यापक व असंख्य विषयवारी कोश निर्माण झाले आहेत तेथे एका प्रकारचे कोश पुरे झाले, दुसऱ्या प्रकारचे अधिक हवेत वगैरे म्हणता येईल. अर्थात अजूनही इंग्लंड–अमेरिकेत सर्वविषयसंग्राहक असे अकारविल्हे रचलेले नवेनवे कोश प्रतिवर्षी निघत आहेत, त्याच प्रमाणे जुन्या कोशांच्या नव्या आवृत्त्याही निघत आहेत हेही लक्षात घ्यावयास हवे. काही असले तरी मराठीसारख्या भाषेत एक तरी चांगला सर्वसंग्राहक कोश निर्माण झाल्याखेरीज पुढे पाऊल टाकणे शक्य नाही आणि अभिप्रेत असलेल्या सर्वसामान्य वाचकाची पातळी लक्षात घेतली तर सुलभ संदर्भाच्या दृष्टीने तो अकारविल्हे रचणेच युक्त होईल. मराठीत विषयवार कोशही आवश्यक होणारच. पूर्वी 'व्यायाम ज्ञानकोशा'सारखे असे प्रयत्न झाले आहेत, ते स्पृहणीय आहेत. पण एकंदरीत ते पुढील पायरीवर करावयाचे काम आहे.

प्रस्तुत विश्वकोश १९ खंडांचा होईल. प्रत्येक खंड १,००० पृष्ठांचा असेल व प्रत्येक पृष्ठ या परिचय-ग्रंथाच्या पृष्ठाच्या आकाराचे आणि पुढे नमुना-नोंदी दिल्या आहेत त्या पद्धतीने दोन स्तंभांत छापलेले, सुमारे ७५० शब्द सामावणारे असेल. १ ते १७ खंडांत अ पासून ज्ञ पर्यंत लहानमोठ्या अकारविल्हे नोंदींखाली सर्व विषय सांगितले जातील. अठरावा खंड इंग्रजी-मराठी आणि मराठी-इंग्रजी असा पारिभाषिक शब्दसंग्रहांचा असेल. एकोणिसाव्या खंडात नकाशे व सूची देण्यात येईल. विश्वकोशाचा अठरावा खंड म्हणजे मराठीची एक विशेष अशी गरज आहे. विश्वकोशामध्ये जे अनेक विषयोपविषय यावयाचे आहेत त्यांपैकी अनेक मराठीत प्रथमच लिहिले जातील. अशा अनेक विषयांवर मराठीत निश्चित रूढ झालेले शब्द नाहीत म्हणून विश्वकोशात कोणता शब्द कोणत्या अर्थाने वापरला आहे हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. पुष्कळ वाचकांना इंग्रजी शब्दच माहीत असतील. त्यांना त्या विषयाची माहिती पाहिजे असेल तर त्या इंग्रजी शब्दाला विश्वकोशात कोणता मराठी प्रतिशब्द वापरला आहे हे या खंडात पाहून मगच ती नोंद काढून वाचावी लागेल.

पारिभाषिक शब्दांसाठी मुख्यतः भारत सरकारच्या 'पारिभाषिक शब्दसंग्रहा'चा उपयोग केला जाईल. याखेरीज पुणे विद्यापीठ वगैरे मान्यवर संस्थांनी तयार केलेल्या शब्दकोशांचेही साहाय्य घेतले जाईल. तसेच मराठीत रूढ झालेले शब्द स्वीकारले जातील आणि काही इंग्रजी शब्द जसेच्या तसे ठेवले जातील. कोणताही एक शब्दकोश सर्वस्वी मान्य धरला जाणार नाही. अखिल भारतीय दृष्टी ठेवूनही एखादा शब्द मराठीच्या प्रकृतीशी जुळतो किंवा नाही हे पाहावे लागेलच.

विषयाचा दर्जा कमी न करता व शास्त्रीय सत्यांना बाध न आणता प्रत्येक विषय जितका शक्य होईल तितका सोपा केला जाईल. परंतु काही विषयांचा स्वभाव असा आहे की, ते सोप्या रीतीने मांडणेच अशक्य असते. तेथे मात्र लेखकाचा नाइलाज होतो हेही लक्षात ठेवले पाहिजे. उदाहरणार्थ, 'सापेक्षतावाद', अणुविज्ञानातील 'अनियतिवाद' वगैरेंसारखे विषय सोपे करणे म्हणजे विषय न सांगणे, अर्धामुर्धाच सांगणे, किंबहुना चुकीचा सांगणे असेच व्हायचा संभव असतो. चित्रे, आकृत्या, नकाशे वगैरेंचा विषय स्पष्ट करण्यासाठी भरपूर उपयोग केला जाईल. चित्रकला, वास्तुशिल्प, भरतकाम वगैरेसारखे ललितकलांतर्गत विषयोपविषय तर, चित्रांचे आणि आकृत्यांचे साहाय्य घेतल्याखेरीज सांगणे अशक्यच आहे. त्याखेरीज सर्वसामान्य मराठी जिज्ञासूला मानव्यविद्या व विज्ञान आणि तंत्र यांतील सर्वच विषयोपविषयांतील माहिती सुलभतेने मिळावी ह्या हेतूच्या अनुरोधाने हा कोश जास्तीत जास्त उपयुक्त करण्याची दृष्टी असल्यामुळे सर्वत्रच छायाचित्रांचा, रेखाचित्रांचा भरपूर उपयोग केला जाईल. १९ व्या खंडात सुमारे दोनशे मोठे नकाशे देण्यात येणार आहेत. त्याखेरीज १ ते १७ खंडांत निरनिराळ्या नोंदींतील विविध विषय स्पष्ट करण्यासाठी अनेक लहान मोठे नकाशे देण्यात येतील. प्रत्येक देशावरील नोंदीच्या सुरुवातीस त्या देशाचा एक छोटासा नकाशा असेल. विज्ञान व तंत्र कक्षेतील पुष्कळसे विषय व मानव्यविद्या कक्षेतीलही अर्थशास्त्रासारखे विषय आकृत्यांनी आणि आराखड्यांनी स्पष्ट केले जातील. देशोदेशींची प्राकृतिक वैशिष्ट्ये व निरनिराळ्या समाजांच्या सांस्कृतिक जीवनाची विविध अंगे अनेक साध्या व रंगीत छायाचित्रांच्या आणि रेखाचित्रांच्या साहाय्याने दाखविण्यात येतील. चित्रे व आकृत्यांच्या द्वारा कोशाची उपयोगिता व आकर्षकताही जितकी वाढवता येईल तितकी वाढविण्याचा प्रयत्न राहील.

## विश्वकोशात येणारे विषय व त्यांसाठी निश्चित केलेली पृष्ठसंख्या

हा कोश सर्वविषयसंग्राहक स्वरूपाचा असून अकारविल्हे रचला जाणार आहे हे मागे सांगितलेच आहे. परंतु अशा कोशाबाबतही त्यात यावयाचे विषयोपविषय नेमके कोणते त्यांपैकी कोणत्या विषयाला किती महत्त्व द्यावयाचे आणि त्यानुसार पृष्ठांची वाटणी कशी करावयाची हे गणित मांडावेच लागते. अन्यथा कोशात प्रमाणबद्धता राहात नाही. जास्त महत्त्वाचे विषय त्रोटकपणे सांगितले जाणे व कमी महत्त्वाच्या विषयांनी फार जागा व्यापली जाणे असे दोष टाळण्यासाठी पृष्ठसंख्येची विषयवार वाटणी करून घेणे आवश्यक असते. प्रत्येक विषयाची पृष्ठसंख्या ठरल्यानंतर त्या त्या विषयाखाली येणाऱ्या नोंदींची यादी करून विषयासाठी ठरविलेली एकंदर पृष्ठे त्या नोंदींमध्ये योग्य त्या प्रमाणात वाटावी लागतात. अशा सर्व विषयांतील सर्व नोंदी एकत्र मिसळून त्या सगळ्याच, विषय विचारात न घेता, अकारविल्हे लावून कोशात घालावयाच्या असतात. त्यामुळे कोशाच्या अंतिम स्वरूपात या वाटणीचा पानोपानी पुरावा राहणार नाही. अर्थात एकंदर कोशात तो राहीलच. प्रारंभी अशी वाटणी करून घेतल्याखेरीज कोशरचना व्यवस्थित करताच येणार नाही.

अशा तऱ्हेच्या वाटणीची सर्वमान्य किंवा शास्त्रीय अशी काही पद्धत नाही. आपणाकडे असलेली एकंदर पृष्ठसंख्या आणि आपल्याला अभिप्रेत असलेला वाचक या दोन गोष्टी लक्षात घेऊन हा निर्णय संपादकांना घ्यावा लागतो. उदाहरणार्थ, कोशामध्ये इतिहासविषयासाठी असलेल्या ९०० पृष्ठांपैकी ४०० पृष्ठे भारतीय इतिहासासाठी व त्या ४०० पृष्ठांपैकी १०० पृष्ठे महाराष्ट्राच्या

इतिहासासाठी असावीत की नाही, हा प्रश्न तात्त्विक दृष्ट्या निश्चितच वादाचा होऊ शकेल. तथापि, संपादकांनी आपल्या भोवतालचे मराठी वाचक लक्षात घेऊन हा निर्णय घेतलेला असतो. असे निर्णय कमीअधिक प्रमाणात वैयक्तिक स्वरूपाचे असणे आणि म्हणून ते विवाद्य राहणे हे अपरिहार्य असते.

शिवाय पृष्ठसंख्येची विषयवार वाटणी अगदी काटेकोर कधीच होऊ शकत नाही. निरनिराळी शास्त्रे आणि कला एकमेकांत अशा तऱ्हेने मिसळलेली आहेत की, बराचसा भाग निश्चित अमुक शास्त्राखालचा असे म्हणता आले तरी पुष्कळ भाग असाही राहतो की तो अमुकच शास्त्राचा किंवा कलेचा प्रांत आहे असे म्हणता येणार नाही. उदाहरणार्थ सौंदर्यशास्त्र हा विषय तत्त्वज्ञान, साहित्य आणि ललितकला या सर्व क्षेत्रांत सारखाच जिव्हाळ्याचा आहे. कोशात सौंदर्यशास्त्र अशी एकच नोंद येईल. ती पंधरा पृष्ठांची असली आणि उपरोक्त तिन्ही विषयांतून कमीअधिक पृष्ठे त्यासाठी घेतलेली असली तर नोंदीत आलेल्या मजकुरात नेमकी तत्त्वज्ञानाची चर्चा किती, साहित्यशास्त्रीय चिकित्सा किती आणि कलामीमांसेचा भाग किती याची मोजणी करणे अशक्य आहे. म्हणूनच 'एन्सायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सेस'च्या संपादकांनी म्हटल्याप्रमाणे शेवटी पृष्ठांच्या विषयवार वाटणीला पुष्कळदा कोशात फारसा अर्थ राहात नाही. तथापि अशा काही अडचणी आणि मर्यादा असल्या तरी एकंदरीत विषयवार पृष्ठांची वाटणी आवश्यकच असते आणि शक्य तितकी त्यानुसारच कोशरचना करावी लागते.

## विश्वकोशात यावयाचे विषय आणि त्यांची पृष्ठसंख्या यांबाबतचे तपशील

### एकंदर पृष्ठांची कक्षावार वाटणी

| | पृष्ठे | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| १. मानव्यविद्या कक्षा | ८,५०० | २. विज्ञान व तंत्र कक्षा | ८,५०० |

### प्रत्येक कक्षेसाठी असलेल्या पृष्ठांची विभागवार वाटणी

| मानव्यविद्या कक्षा | | विज्ञान व तंत्र कक्षा | |
|---|---|---|---|
| विभाग | पृष्ठे | विभाग | पृष्ठे |
| १. सामाजिक विज्ञाने | ५,२५० | १. सैद्धांतिक विज्ञाने | ३,२८८ |
| २. भाषा व साहित्य | १,७५० | २. अनुप्रयुक्त विज्ञाने | ४,९४२ |
| ३. ललितकला | ९०० | ३. राखीव पृष्ठे | २७० |
| ४. खेळ व मनोरंजन | १०० | | |
| ५. राखीव पृष्ठे | ५०० | | |
| एकुण | ८,५०० | एकुण | ८,५०० |

### प्रत्येक विभागासाठी असलेल्या पृष्ठांची विषयवार वाटणी

| मानव्यविद्या कक्षा | | विज्ञान व तंत्र कक्षा | |
|---|---|---|---|
| सामाजिक विज्ञाने | पृष्ठे | सैद्धांतिक विज्ञाने | पृष्ठे |
| १. अर्थशास्त्र | ८०० | १. गणितशास्त्र | २५१ |
| २. इतिहास | ९०० | २. ज्योतिषशास्त्र | १५७ |
| ३. कायदा | २६० | ३. प्राणिविज्ञान | ५९२ |
| ४. तत्त्वज्ञान | ४०० | ४. भूगोल, प्राकृतिक | ३५० |
| ५. धर्म | २५० | ५. भूविज्ञान | २३८ |
| ६. पुरातत्त्वविद्या | १०० | ६. भौतिकी | ६२२ |
| ७. मानवशास्त्र | २०० | ७. रसायनशास्त्र | ५२३ |
| ८. भूगोल विज्ञान | ६८० | ८. वनस्पतिविज्ञान | ५५५ |
| (+३५० विज्ञान व तंत्र कक्षेकडील) | | एकुण | ३,२८८ |

| सामाजिक विज्ञाने | पृष्ठे |
|---|---|
| ९. मानसशास्त्र | ३५० |
| १०. युद्धशास्त्र | ६० |
| (+२०० विज्ञान व तंत्र कक्षेकडील) | |
| ११. राज्यशास्त्र | ५०० |
| १२. शिक्षण | ३०० |
| १३. समाजशास्त्र | ४५० |
| एकूण | ५,२५० |

## भाषा व साहित्य

| विभाग | पृष्ठे |
|---|---|
| १. भाषाशास्त्र | १८० |
| २. साहित्यसमीक्षा | ६० |
| ३. साहित्यप्रकार | ७० |
| ४. साहित्यसंबंधी सामान्य विषय | ११० |
| ५. जगातील भाषा व साहित्ये | १,३०० |
| ६. लिपी प्रकार | ३० |
| एकूण | १,७५० |

## ललितकला

| विभाग | पृष्ठे |
|---|---|
| १. कला (सामान्य) | ७० |
| २. चित्रकला | १०० |
| ३. वास्तुकला | १०० |
| ४. मूर्तिकला | १०० |
| ५. संगीत | १०० |
| ६. नृत्य | १०० |
| ७. रंगभूमी | १०० |
| ८. चित्रपट | ६० |
| ९. लघुकला व कारागिरी | १०० |
| १०. अलंकरण, वेष इ० | ७० |
| एकूण | ९०० |

## खेळ व मनोरंजन

| विभाग | पृष्ठे |
|---|---|
| १. खेळ | ६५ |
| २. मनोरंजन | ३५ |
| एकूण | १०० |

| अनुप्रयुक्त विज्ञाने | पृष्ठे |
|---|---|
| १. अंतरिक्ष विज्ञान | २७ |
| २. अभियांत्रिकी, अणुगर्भीय | २५ |
| ३. अभियांत्रिकी, ऑटोमोबाईल | ४० |
| ४. अभियांत्रिकी, खनिकर्म | २६ |
| ५. अभियांत्रिकी, नाविक व बंदर किनारीय | ८५ |
| ६. अभियांत्रिकी, यांत्रिक, | २३७ |
| ७. अभियांत्रिकी, रासायनिक | १२३ |
| ८. अभियांत्रिकी, विद्युत | १४० |
| ९. अभियांत्रिकी, वैमानिकी | |
| १०. अभियांत्रिकी, संदेशवहन | १२८ |
| ११. अभियांत्रिकी, स्थापत्य | ३५१ |
| १२. उद्योगधंदे व व्यापार | १,२७१ |
| १३. कीटकविज्ञान | ६६ |
| १४. कृषिविज्ञान | ३६५ |
| १५. खनिज–निक्षेप | ८७ |
| १६. धातुविज्ञान | १०० |
| १७. पशुविज्ञान | १५७ |
| १८. भू-भौतिकीय समन्वेषण | १५ |
| १९. मत्स्योद्योग | ४३ |
| २०. युद्धशास्त्र | २०० |
| २१. वनस्पती रोगविज्ञान | २५ |
| २२. वातावरणविज्ञान | १५७ |
| २३. वैद्यक | ९०० |
| २४. वैज्ञानिक संस्था | ३७ |
| २५. संकीर्ण विज्ञाने | ४४ |
| २६. संग्रहालये | ३० |
| २७. सांख्यिकी | १०७ |
| २८. सूक्ष्मजीवशास्त्र | ८४ |
| एकूण | ४,९४२ |

## विषयवार तपशील : मानव्यविद्या कक्षा

### सामाजिक विज्ञाने

मानव्यविद्या कक्षेचे वर दर्शविल्याप्रमाणे चार मुख्य विभाग पाडले आहेत. त्यांपैकी सामाजिक विज्ञाने हा विभाग सर्वात मोठा ५,२८० पृष्ठांचा म्हणजे मानव्यविद्या कक्षेच्या पृष्ठसंख्येपैकी जवळजवळ दोनतृतीयांश जागा व्यापणारा असा आहे.

वर सामाजिक विज्ञानाखाली किती विषय घ्यावयाचे त्यांची यादी दिली आहे व प्रत्येक विषयाची पृष्ठसंख्याही दर्शविली आहे. वर्णनाच्या व विवेचनाच्या सोयीसाठी सामाजिक विज्ञाने, भाषा व साहित्य, ललितकला आणि खेळ व मनोरंजन अशांसारखे भाग पाडले, तरी हे सर्व भाग

परस्परांपासून संपूर्णपणे भिन्न असे असूच शकत नाहीत. समाजाचे मत समजले तर त्या समाजाने निर्माण केलेले साहित्य समजू शकते. तर पुष्कळदा त्या साहित्यातून समाजाची ओळख पटते. समाजाचा व त्याने निर्माण केलेल्या चित्रकला, संगीत, नृत्य, इत्यादी ललितकलांचा आणि त्यांचे खेळ, त्यांचे छंद, यांचाही असाच संबंध आहे. या संदर्भात केवळ मानव्यविद्या कक्षेतील चार विभागांचा परस्परसंबंधच नव्हे, तर मानव्यविद्या कक्षेचा विज्ञान व तंत्र विद्या कक्षेशी असलेला संबंध-सुद्धा काळजीपूर्वक लक्षात घ्यावयास पाहिजे. उदाहरणार्थ, जीवशास्त्र व मानवशास्त्र या दोन कक्षांतील दोन ज्ञानशाखांमध्ये एक जीवप्रकार म्हणून माणसासंबंधी जो विचार होईल तो एकच असेल आणि मानवाचे सम्यक्‌दर्शन मानवी शरीरविज्ञान आणि मानवी संस्कृती ह्यांचे एकत्रितपणे अवलोकन करूनच होऊ शकेल. उद्योगधंद्यांचा, कृषीचा, अर्थशास्त्रीयदृष्ट्या विचार करीत असता त्यांची तांत्रिक बाजू विसरणे चुकीचे ठरेल. भूगोल हा विषय तर दोन्ही कक्षांच्या सीमेवरच बसल्यासारखा आहे.

दोन कक्षांचे आणि प्रत्येक कक्षेतील भागांचे व विषयांचे हे परस्परावलंबित्व लक्षात घेऊनही वर म्हटल्याप्रमाणे अभ्यासाच्या सोयीसाठी ज्ञानाचा भागशः व विषयवार विचार करावाच लागतो. सामजिक विज्ञानांखाली येणारे, वर दाखविलेले निरनिराळे विषय, व्यक्ती व समाज यांच्यातील संबंधांच्या निरनिराळ्या बाजू दाखवितात. माणसे, त्यांनी निर्माण केलेल्या संस्था व त्या माणसांचे आणि संस्थांचे संबंध व संघर्ष हा विषय एवढा प्रचंड आहे की, त्याच्या सर्व बाजू सर्व दृष्टिकोनांतून दाखविण्यासाठी, मानव्यविद्या कक्षेच्या जागेपैकी दोन तृतीयांश पृष्ठसंख्या त्यासाठी देणे प्राप्तच आहे. वर सामाजिक विज्ञानांखाली दाखविलेले तेरा विषय हे कधीकधी निराळ्या तऱ्हेनेही मांडण्यात येतात. इतिहास ही गतघटनांची हकीकत असल्यामुळे मनुष्य व समाज यांमधील आजचे परस्पर संबंध दाखविण्यासाठी त्याचा काही उपयोग नाही, या भूमिकेवरून हा विषय कधी कधी सामाजिक विज्ञानांतून वगळून, स्वतंत्रपणे हाताळला जातो. त्याचप्रमाणे तत्त्वज्ञान, धर्म व मानसशास्त्र यांचाही एक निराळाच गट करण्याची पद्धत आहे. तथापि, पूर्वी पाहिल्याप्रमाणे गटवार किंवा विषयवार रचना ही शेवटी एक प्रकारची सोयच असल्यामुळे विश्वकोशाच्या रचने-पुरती या तेराही विषयांची गणना सामाजिक विज्ञानात केली गेली आहे. गृहविज्ञानासारख्या काही संमिश्र विषयांची व्यवस्थाही यात अंतर्भूत आहे.

सामाजिक विज्ञानांखाली येणाऱ्या निरनिराळ्या विषयांच्या सीमारेषाही निश्चित आखता येणार नाहीत. कुटुंबसंस्थेसारख्या अनेक सामाजिक संस्था या अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, शिक्षण या सर्व विषयांना सारख्याच महत्त्वाच्या वाटत असतात. कार्ल मार्क्स, महात्मा गांधी अशा विचारवंतांची दखल इतिहासाला, अर्थशास्त्राला, राज्यशास्त्राला, तत्त्वज्ञानादी सर्वांनाच घ्यावी लागते. म्हणूनच ज्याप्रमाणे कक्षा, विभाग, विषय या कमीअधिक प्रमाणात सोयीच्या गोष्टी आहेत, त्याचप्रमाणे सामाजिक विज्ञानांतील प्रत्येक विषयाखाली काय यावे हेही काही अंशी सोय पाहूनच निश्चित करणे भाग पडते. तेव्हा प्रत्येक विषयासाठी दिलेली पृष्ठसंख्या ही मुख्यतः निश्चितपणे त्या विषयाखाली येणाऱ्या माहितीसाठी व विवेचनासाठी उपयोगात येणार असली, तरी अनेक वेळा एका विषयासाठी मुक्रर केलेली जागा दुसऱ्या विषयाच्या काही भागांसाठी वापरली जाणे अपरिहार्यच नव्हे तर इष्टही ठरेल.

प्रत्येक सामाजिक विज्ञान, विश्वकोशात एका विशिष्ट प्रकाराने अंतर्भूत केले जाईल. एक व्याप्तिलेख (सुमारे ५ ते २५ पृष्ठांचा), काही साधारणतः मोठे लेख (एक ते चार पृष्ठांचे) व अनेक लहान नोंदी (एक दशांश ते नऊ दशांश पृष्ठांच्या) यांमधून सबंध विषय सांगितला जाईल. व्याप्तिलेखाखालील त्या त्या विषयाचे एक समग्र दर्शन एका ठिकाणी घडविले गेले तरी सबंध विषय त्या विशिष्ट विषयावरच्या पुस्तकाप्रमाणे एका जागी सापडणार नाही. अकारविल्हे लावलेल्या नोंदींतून तो सतराही खंडांतून इतस्ततः विखुरलेला असेल.

व्याप्तिलेखात त्या विषयाची व्याख्या, त्याने व्यापलेला प्रांत व इतर विषयांशी असलेले संबंध, त्याच्या अभ्यासाची पद्धती व महत्त्व, प्राचीन कालापासून आजपर्यंतचा त्या विषयाचा

विकास इत्यादी गोष्टी तपशीलवार दिल्या जातील. जगातील, भारतातील व महाराष्ट्रातील त्या विषयाचा अभ्यास करणाऱ्या संस्था, त्याचप्रमाणे त्या विषयाचे अभ्यासक यांसंबंधी उपयुक्त व मार्गदर्शक अशी सर्व माहिती दिली जाईल. व्याप्तिलेखाच्या शेवटी अधिकृत व मान्यवर अशा संदर्भग्रंथांची, त्या विषयावरील प्रमुख नियतकालिकांचीही माहिती प्रामुख्याने दिली जाईल, आणि इतर लेखांखाली संदर्भग्रंथांचा निर्देश आवश्यक तितका परंतु संक्षेपाने केला जाईल. एकंदरीत प्रत्येक प्रमुख विषयावरील व्याप्तिलेखाचे स्वरूप असे राहील की, ज्यावरून वाचकाला त्या विषयाची स्पष्ट कल्पना यावी व पुढील अभ्यासाच्या दृष्टीने त्यास सर्व प्रकारचे मार्गदर्शन मिळावे. इतर सर्व लहानमोठ्या नोंदी या वाचकांच्या सोयीच्या दृष्टीने, संदर्भ सुलभ व्हावा अशा पद्धतीने निवडून निश्चित केलेल्या असतील.

सर्वसाधारणपणे प्रत्येक सामाजिक विज्ञानाची व्यवस्था अशा प्रकारे लागणार असली तरी विषयाच्या विशिष्ट गरजेप्रमाणे त्याची तपशीलवार रचना निरनिराळीच राहील. स्थूलमानाने प्रत्येक विषयाची भागवार पृष्ठसंख्या खालीलप्रमाणे राहील.

### अर्थशास्त्र व वाणिज्य (पृष्ठे ८००)

| | |
|---|---|
| १. **अर्थशास्त्रीय सिद्धांत :** विषयाचे स्वरूप, महत्त्वाचे सिद्धांत, अर्थविषयक सामान्य ज्ञान, अर्थव्यवस्थेतील महत्त्वाच्या संस्था. | २०० |
| २. **अर्थशास्त्राचा इतिहास :** अर्थशास्त्रीय सिद्धांतांचा इतिहास (भारतीय अर्थशास्त्रीय कल्पनांच्या उल्लेखासह). | ३५ |
| ३. **आर्थिक इतिहास :** योग्य त्या प्रमाणात प्रत्येक देशाच्या आर्थिक प्रगतीचा इतिहास व तेथील सांप्रतची आर्थिक परिस्थिती. | १०० |
| ४. **अर्थव्यवस्थापद्धती :** भांडवलशाही, समाजवादी, नियोजनात्मक वगैरे अर्थव्यवस्थापद्धती व त्यांसंबंधीचे दृष्टिकोन. (ह्यांसाठी अधिक पृष्ठे राज्यशास्त्राखाली आहेत). | २० |
| ५. **भारतीय अर्थव्यवस्था :** भारताची आर्थिक स्थिती, आर्थिक समस्या. | २७५ |
| ६. **वाणिज्य व व्यापार :** व्यवसायस्वरूप, व्यवसाय प्रशासनशास्त्र, व्यापारी संस्था इत्यादी. | ८० |
| ७. **संकीर्ण :** प्रमुख अर्थशास्त्रज्ञ, उद्योगप्रवर्तक, कामगारनेते, वगैरेंबद्दलची लहान परिचयात्मक टिपणे; काही अर्थशास्त्रांतर्गत संज्ञांची व कल्पनांची स्पष्टीकरणे. | ९० |
| **एकूण** | ८०० |

### इतिहास (पृष्ठे ९००)

(अ) जागतिक इतिहास ४८० पृष्ठे

| | |
|---|---|
| १. **इतिहास सर्वसामान्य :** व्याख्या, विषयाचे स्वरूप, इतिहासाचे तत्त्वज्ञान व त्याचा इतिहास; इतिहासलेखन व त्याचा इतिहास; इतिहासाचे कार्य इत्यादी. | ६० |
| २. **प्रागितिहास :** प्रागितिहासातील निरनिराळे कालखंड व त्यांतील जीवन | ३५ |
| ३. **प्राचीन संस्कृती :** ईजिप्त, सुमेरिया, बॅबिलोनिया, इराण, ग्रीस, रोम वगैरे ठिकाणच्या प्राचीन संस्कृतींचे समालोचन. | ११० |
| ४. **मध्ययुग :** रोमन साम्राज्याच्या विनाशापासून यूरोपीय प्रबोधनकालापर्यंतचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास. | ७५ |
| ५. **आधुनिक काल :** यूरोपीय प्रबोधनकालापासून पहिल्या महायुद्धापर्यंतचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास, यूरोपीय प्रबोधन, धर्मसुधारणेची चळवळ, भौगोलिक संशोधने, औद्योगिक क्रांती, राष्ट्रवादाचा उद्गम व विकास, लोकशाही, समाजवाद व साम्राज्यवाद यांचे विकास, अमेरिकेचा उदय, पहिले महायुद्ध वगैरे महत्त्वाच्या घटनांचे आढावे. | १०० |

**६. अर्वाचीन काल :** १००
पहिल्या महायुद्धापासून दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीपर्यंतचा काल, यूरोपातील हुकूमशाह्या, आशिया व आफ्रिकेचे आधुनिकीकरण, अमेरिकेचा उत्कर्ष व प्रभाव, दुसरे महायुद्ध इत्यादी घटनांचे आढावे. (दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर आजतागायतच्या घडामोडी राज्यशास्त्र या विषयाखाली घेतल्या आहेत).

(आ) भारतीय इतिहास ४२० पृष्ठे.

**१. भारतीय इतिहास : सर्वसामान्य** २५
भारतीय इतिहासाचे तत्त्वज्ञान व त्याचा इतिहास; भारतीयांचे इतिहासलेखन व त्याचा इतिहास; भारताच्या इतिहासाचे लेखन व त्याचा इतिहास.

**२. प्रागितिहास व पारंपारिक इतिहास :** ३०
प्रागितिहासाचे निरनिराळे कालखंड व सिंधूसंस्कृती आणि तत्कालिन जीवन; पुराणे, महाकाव्ये वगैरेंतून मिळणारा नंदपूर्व कालाचा पारंपरिक इतिहास.

**३. प्राचीन कालखंड :** ११०
परकीयांच्या स्वाऱ्या; मगधांचा उदय; नंद, मौर्य, गुप्त, वाकाटक, चेर, चोल, पांड्य इत्यादी उत्तर व दक्षिण हिंदुस्थानातील इ. स. च्या ८ व्या शतकापर्यंतच्या राजवंशांचा इतिहास व तत्कालीन जीवन.

**४. मध्ययुग (हर्षोत्तर व मोगलपूर्वकाल) :** ५०
मुसलमानी आक्रमणे; घोर, गुलाम, खिलजी, तुघलख वगैरे घराण्यांचा इतिहास व तत्कालीन जीवन; प्रादेशिक मुसलमानी सत्ता, विजयानगरची सत्ता इत्यादी.

**५. मोगलकाल :** ४५
बाबर, हुमायून, सूरघराणे, अकबर, शहाजहान, औरंगजेब, बहादुरशहा आणि शेवटचे मोगल बादशहा ह्यांच्या कारकीर्दी व तत्कालीन जीवन.

**६. मराठ्यांच्या सत्तेचा काल :** ७५
शिवाजी, संभाजी, राजाराम, शाहू आणि नंतरचे छत्रपती; पेशवे व मराठमंडळांतील शिंदे, होळकर, वगैरेंच्या कारकीर्दी व तत्कालीन जीवन.

**७. ब्रिटिशांच्या सत्तेचा काल :** ८५
ब्रिटिशांचे भारतातील सत्तासंपादन; गव्हर्नर–जनरलांच्या व व्हाईसरॉयांच्या कारकीर्दी; ब्रिटिशसत्तेचे भारतावरील बरेवाईट परिणाम; ब्रिटिशसत्तेची अखेर (स्वातंत्र्योत्तर घडामोडींचे समालोचन राज्यशास्त्राखाली घेतले आहे.)

**एकूण ९००**

## कायदा व न्यायशास्त्र (पृष्ठे २६०)

**१. न्यायशास्त्र : सर्वसामान्य** ५०
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप, विषयाचा इतिहास.

**२. कायदा : सर्वसामान्य** ७५
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप, उगम आणि साध्ये; विधिनिर्मिती, अर्थनिर्णय इत्यादी; कायद्याचे राज्य; कायदेपद्धती व शाखोपशाखा; दिवाणी व फौजदारी कायदे; आंतरराष्ट्रीय कायदा, मुसलमानी कायदा, संविधान कायदा इत्यादी.

**३. भारतीय न्यायशास्त्र आणि कायदेपद्धती :** ८५
निरनिराळ्या कालखंडांतील स्थिती; न्यायदान व न्यायालये, न्यायसंबंधित अधिकारी; वकिलीचा व्यवसाय, कायद्याचे शिक्षण; कायदा व सुव्यवस्था; पोलीस यंत्रणा, कारागृहे; निरनिराळ्या विषयांवरील कायदे; इत्यादी.

**४. सुनीती :** १०
व्याख्या, स्वरूप, सुनीतिसूत्रे

**५. संकीर्ण :** ४०
महत्त्वाच्या कल्पनांचे व संज्ञांचे विशदीकरण; प्रसिद्ध कायदेकार, धर्मशास्त्रकार, धर्मनिबंधकार कायदेपंडित, न्यायाधीश इत्यादींची संक्षिप्त चरित्रे.

**एकूण २६०**

## तत्त्वज्ञान (पृष्ठे ४००)

१. **तत्त्वज्ञान : सर्वसामान्य** — ५०
व्याख्या व व्याप्ती, विषयाचा इतिहास, प्राचीन तत्त्वज्ञान, आधुनिक पाश्चिमात्य तत्त्वज्ञान व सद्यःस्थिती.

२. **वाद व संप्रदाय :** — ७०
आदर्शवाद, वास्तववाद, अज्ञेयवाद, अनुभववाद, गूढवाद इत्यादी विविध विचारप्रणालींचे ऐतिहासिक आढावे व विवेचन.

३. **तर्कशास्त्र :** — ४५
व्याख्या, व्याप्ती व विविध पद्धती

४. **नीतिशास्त्र** — २०
व्याख्या, व्याप्ती व विविध विचार-प्रणाली

५. **सौंदर्यशास्त्र :** — ६०
व्याख्या, व्याप्ती व विविध दृष्टिकोन.

६. **भारतीय तत्त्वज्ञान :** — १५०
हिंदू, बौद्ध व जैन मतांतील विविध दर्शने; भारतीय नीतिशास्त्र.

७. **संकीर्ण :** — ५५
प्रमुख भारतीय व अभारतीय तत्त्ववेत्त्यांच्या चरित्रात्मक नोंदी; तत्त्वज्ञान विषयांतर्गत विशिष्ट संज्ञांची स्पष्टीकरणे इत्यादी स्वरूपाच्या लहानमोठ्या नोंदी.

**एकूण ४००**

## धर्म (पुराणविद्येसह) (पृष्ठे २८०)

१. **धर्म : सर्वसामान्य** — २०
व्याख्या, स्वरूप, धर्मसंस्थेचा इतिहास आणि धर्म व समाज यांच्या परस्पर संबंधांच्या अनुरोधाने विविध विषयांची चर्चा.

| | |
|---|---|
| २. **हिंदुधर्म** | ८० |
| ३. **बौद्धधर्म** | ३० |
| ४. **जैनधर्म** | २० |
| ५. **इस्लामधर्म** | ३० |
| ६. **यहुदीधर्म** | १० |
| ७. **झोरोष्ट्रियन धर्म** | १० |
| ८. **शीख धर्म** | ५ |
| ९. **शिंटो धर्म** | ५ |
| १०. **ताओ धर्म** | ५ |
| ११. **कनफ्युशियन धर्म** | ५ |
| १२. **ख्रिस्तीधर्म** | ३० |
| १३. **इतर प्राचीन व अर्वाचीन धर्म आणि पंथ** | ३० |

(प्रत्येक धर्मासाठी दिलेल्या पृष्ठसंख्येत त्या त्या धर्मातील धर्मसंस्थापक, धर्मप्रचारक वगैरेंची चरित्रे, धर्माची तत्त्वे, धार्मिक संस्था, आचार व परंपरा, सण, व्रते, उत्सव त्याचप्रमाणे प्रत्येक धर्माशी संबंधित अशी पुराणविद्या यांवर विविध नोंदी केल्या जातील.)

**एकूण २८०**

## पुरातत्त्वविद्या (पृष्ठे १००)

१. **पुरातत्त्वविद्या : सर्वसामान्य** — ५०
(अ) विषयाचे स्वरूप व इतिहास; उत्खननशास्त्र व उत्खननांचा इतिहास; उत्खननातून मिळणारा इतिहास व त्याचे महत्त्व.
(आ) पुरातत्त्वविद्येच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा जगातील अनेक स्थळांच्या लहान मोठ्या नोंदी.

२. **पुरातत्त्वविद्या : भारतीय** — ४०
(अ) भारतातील पुरातत्त्वविद्या व तिचे महत्त्व.
(आ) पुरातत्त्वविद्येच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा भारतातील अनेक स्थळांच्या लहान-मोठ्या नोंदी.

३. **संकीर्ण :** — १०
पुरातत्त्वविद्येतील काही पारिभाषिक संज्ञांची स्पष्टीकरणे, प्रमुख पुरातत्त्ववेत्त्यांची अल्पचरित्रे इत्यादी.

## भूगोल (पृष्ठे १०३०)

१. **भूगोल : सर्वसामान्य** — ५०
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप, विषयाचा इतिहास, विषयाचे विभाग.

२. **खंड :** ८०

प्रत्येक खंडाचे भूवर्णन; इतिहास; राजकीय, आर्थिक व सामाजिक स्थिती यांविषयी सर्वसामान्य माहिती

३. **देश :** २५०

प्रत्येक देशाचे भूवर्णन; त्याचा संक्षिप्त इतिहास; तेथील राजकीय, आर्थिक व सामाजिक स्थिती; भाषा व साहित्य; शिक्षण, कला, खेळ व तेथील महत्त्वाची स्थळे अशा स्वरूपात माहितीपूर्ण असे विस्तृत लेख.

४. **प्राकृतिक भूगोल :** १००

महासागर, समुद्र, नद्या, पर्वत, बेटे, सरोवरे, वाळवंटे, सामुद्रधुन्या वगैरें-वरील नोंदींत त्यांचे प्राकृतिक वर्णन व त्यांचा मानवी जीवनावर झालेला परिणाम यांविषयी लहान-मोठी टिपणे असतील.

५. **महत्त्वाची स्थळे :** ३२०

राजधान्या; मोठी शहरे; बंदरे; ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक, व्यापारी वा लष्करी दृष्ट्या महत्त्वाच्या आणि प्रेक्षणीय अशा सर्व स्थळां-विषयी लहानमोठी टिपणे.

६. **संकीर्ण :** २३०

प्रमुख भूगोलवेत्ते, प्रवासी, संशोधक, वगैरेंबद्दल परिचयात्मक टिपणे व प्राकृतिक व मानव भूगोलांतर्गत महत्त्वाच्या भौगोलिक संज्ञांची स्पष्टीकरणे.

**एकूण १०३०**

## मानवशास्त्र (पृष्ठे २००)

१. **मानवशास्त्र : सर्वसामान्य** १०

व्याख्या, व्याप्ती, विषयाचे विभाग व विषयाचा इतिहास.

२. **आदिमानव :** १०

मानवप्राय–प्राणी व मानवजीव-नाचा प्रारंभ.

३. **संस्कृती :** २०

संस्कृतीचा अर्थ, विकास, प्रसार; संस्कृतीचे विविध प्रकार; सांस्कृतिक स्थित्यंतरे.

४. **वंश :** ४०

अर्थ, वांशिक गट, वांशिक भेद, वांशिक समस्या आणि वंशविचार.

५. **मानवजातिविज्ञान :** १००

व्याख्या, व्याप्ती, विषयाचा इतिहास; इतिहासकालपूर्वीतील व अर्वाचीन मानवसमूह; जगातील व भारतातील टोळ्या, जमाती इत्यादी.

६. **संकीर्ण :** २०

प्रमुख मानवशास्त्रवेत्त्यांची अल्प-चरित्रे; मानवशास्त्र विषयक संज्ञांची स्पष्टीकरणे.

**एकूण २००**

## मानसशास्त्र (पृष्ठे ३५०)

१. **मानसशास्त्र : सर्वसामान्य** ३०

व्याख्या व व्याप्ती, विषयाचा इतिहास, विषयाचे विभाग.

२. **पद्धती :** ३०

मानसशास्त्राच्या अभ्यासाच्या प्रायोगिक, विश्लेषणात्मक इत्यादी विविध पद्धतींचे आढावे.

३. **वाद व संप्रदाय :** १००

साहचार्य–मानसशास्त्र, मास्तक–सामुद्रिक, रचनात्मक आणि क्रियात्मक–मानसशास्त्र, क्षेत्रीय–मानसशास्त्र, वर्तनवाद, प्रयोजन-वादी–मानसशास्त्र, इत्यादी विविध वाद व संप्रदाय यांचे विवेचन.

४. **शाखा व क्षेत्रे :** १००

सामाजिक मानसशास्त्र, बाल-मानसशास्त्र, औद्योगिक मानसशास्त्र, अपसामान्य मानसशास्त्र, प्राणि-मानसशास्त्र, अतींद्रिय मानसशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र इत्यादींवर लहानमोठ्या नोंदी.

५. **संकीर्ण :** ९०

प्रमुख मानसशास्त्रवेत्त्यांची अल्प-चरित्रे, मानसशास्त्रांतर्गत विविध संज्ञा व मानसशास्त्राशी निगडित अशा अनेक विषयांवरील लहान-मोठ्या नोंदी.

**एकूण २५०**

## युद्धशास्त्र (पृष्ठे २६०)

**१. युद्धशास्त्र : सर्वसामान्य** ४०
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप, विषयाचा इतिहास, युद्धाच्या तात्त्विक व तांत्रिक अंगांची सर्वसाधारण चर्चा, युद्धप्रकार, युद्धनीती, इत्यादी.

**२. युद्धसाहित्य व शस्त्रास्त्रे :** ७०
प्राचीन, आधुनिक व भविष्यकालिक युद्धसाहित्यावर व शस्त्रास्त्रांवर लहानमोठ्या नोंदी.

**३. सैनिकी अभियांत्रिकी :** ५०
विशेष सैनिकी गरजा, विविध तांत्रिक आयोजना.

**४. सैनिकी संघटन :** ५५
इतिहास; आधुनिक संघटनतंत्र; लष्करभरती; शिक्षण – प्रशिक्षण; सैनिकीजीवन; पूरकसेना, स्वयंसेवक इत्यादी.

**५. संकीर्ण :** ४५
निःशस्त्रीकरण, सैनिकी–करार, लष्करी मदत, सैनिकी सरकारे व क्रांत्या इत्यादी विविध विषय; महत्त्वाच्या पारिभाषिक संज्ञांचे विशदीकरण आणि प्रसिद्ध योद्धे, युद्धशास्त्रज्ञ, आदींची अल्पचरित्रे.

**एकूण** २६०

## राज्यशास्त्र (पृष्ठे ५००)

**१. राज्यशास्त्र : सर्वसामान्य** १५०
राज्यशास्त्र–व्याख्या व व्याप्ती; राज्यशास्त्राचा विकास; स्वातंत्र्य, समता, सार्वभौमत्व इत्यादी कल्पनांचे स्पष्टीकरण; राज्य, शासन, इत्यादींच्या व्याख्या; राज्याचे स्वरूप व कार्यक्षेत्र यांसंबंधीचे निरनिराळे वाद; राजकीय संस्थांचा इतिहास.

**२. राज्यघटना व शासनव्यवस्था :** १२५
घटना-व्याख्या, प्रकार इत्यादी; निरनिराळ्या देशांच्या घटना व काही महत्त्वाच्या घटनांचे ऐतिहासिक विकास. शासनव्यवस्था–शासन व त्याचे विभाग; विधिमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ, शासकीय सेवकवर्ग, इत्यादी; लोकमत, राजकीयपक्ष, निवडणुका इत्यादी; स्थानिक-शासन व्यवस्था; सल्लागार समित्या इत्यादी.

**३. आंतरराष्ट्रीय राजकारण :** ७५
आंतरराष्ट्रीयत्व, आंतरराष्ट्रीय परिषदा व संघटना, आंतरराष्ट्रीय संबंध.

**४. भारतीय राजनीती :** १००
भारतातील राज्यशास्त्रविषयक सिद्धांत; इतिहासकालातील राजकीय संस्था, आधुनिक भारताचा घटनात्मक इतिहास, स्वातंत्र्यआंदोलनाचा इतिहास; स्वातंत्र्योतर कालातील भारताची राजकीय प्रगती, भारताची घटना, भारतातील राजकीय पक्ष, सांप्रतच्या राजकारणाचे स्वरूप.

**५. संकीर्ण :** ५०
प्रमुख राज्यशास्त्रवेत्त्यांवरील व प्रमुख राजकारणी व्यक्तींवरील चरित्रात्मक नोंदी; राज्यशास्त्रीय संज्ञांची स्पष्टीकरणे इत्यादी.

**एकूण** ५००

## शिक्षण (पृष्ठे ३००)

**१. शिक्षण : सर्वसामान्य** १००
व्याख्या, व्याप्ती, शिक्षणाचे तत्त्वज्ञान, विषयाचा इतिहास; शिक्षणविषयक विविध मते व संप्रदाय; शैक्षणिक मानसशास्त्र.

**२. शिक्षणसंस्था :** ९०
अर्थ, प्रकार, व्यवस्थापन; विविध विद्या व विद्यालये, त्यांतील अभ्यासक्रम व शिक्षणपद्धती, शैक्षणिक साधने; शैक्षणिक प्रशासन; संघटना, परिषदा इत्यादी.

**३. विशिष्ट शिक्षण :** ३०
अपंग, प्रौढ, कामगार, स्त्रिया वगैरेंच्या शिक्षणाच्या समस्या; व्यावसायिक, तांत्रिक वगैरे विशेष प्रकारच्या शिक्षणाच्या व्यवस्था.

**४. देशोदेशींची शिक्षणव्यवस्था :** ४०
प्रत्येक देशातील शैक्षणिक परिस्थितीचा त्या त्या देशनामावरील नोंदीत आढावा.

**५. संकीर्ण :** ४०
प्रमुख शिक्षणशास्त्रज्ञ, शिक्षणप्रचारक यांची अल्पचरित्रे व शिक्षणशास्त्राशी निगडित असे लहानमोठे विषय.

**एकूण** ३००

## समाजशास्त्र (पृष्ठे ४५०)

**१. समाजशास्त्र : सर्वसामान्य** ३०
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप, विषयाचा इतिहास.

**२. सामाजिक संस्था :** ८०
विवाह, कुटुंब, वर्ण, जाती, वर्ग इत्यादी संस्थांचे ऐतिहासिक समालोचन व सद्यःस्थिती.

**३. विशिष्ट समाजशास्त्र :** १००
ग्रामीण, नागरी, प्रादेशिक, भाषिक वगैरे विशिष्ट दृष्टिकोनांतून केलेली समाजशास्त्रीय पाहणी.

**४. सामाजिक मानसशास्त्र :** ३०
व्याख्या, व्याप्ती, ऐतिहासिक समालोचन व विविध दृष्टिकोन.

**५. विविध सामाजिक समस्या :** ८०
जुगार, गुन्हेगारी, वेश्याव्यवसाय इत्यादी सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह; समाजस्थितीतील बदल व सामाजिक सुधारणा.

**६. भारतीय समाजशास्त्र :** १००
वर १ ते ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे भारतीय समाजाचे आलोचन.

**७. संकीर्ण :** ३०
प्रमुख समाजशास्त्रवेत्त्यांची व समाजसुधारकांची अल्पचरित्रे, समाजशास्त्रविषयक संज्ञांची स्पष्टीकरणे इत्यादी.

**एकूण** ४५०

### भाषा व साहित्य :

भाषा व साहित्य हा, या कक्षेतील विश्वकोशातील पृष्ठसंख्येच्या दृष्टीने सामाजिक विज्ञानांच्या खालोखाल महत्त्वाचा असा विभाग धरून त्यास एकूण १,७५० पृष्ठे दिली आहेत. सामाजिक विज्ञानांसाठी जी जागा आहे त्याच्या फक्त निम्मीच ह्या विभागाला देण्याचे सरळ कारण असे आहे की, भाषा व साहित्य ह्यामागील जे सामाजिक जीवन असते त्याची विविध अंगे सामाजिक विज्ञानांतर्गत विविध विषयांतील अनेक लहानमोठ्या नोंदींतून दाखविली जाणार आहेतच. तथापि, आज विद्येच्या क्षेत्रात, विद्यापीठ इत्यादी संस्था विषयवार अभ्यासक्रम आखून, ज्या गोष्टी सर्वस्वी किंवा मुख्यतः, भाषा व साहित्य ह्या विषयांच्या अध्ययनाखालीच याव्यात असे मानतात, त्या योग्य तऱ्हेने हाताळण्यासाठी मराठी विश्वकोशात हा विभाग वेगळा घेऊन त्याची विशिष्ट प्रकारे व्यवस्था लावली आहे.

माणूस आणि तो बोलत किंवा लिहीत असलेली भाषा ह्या गोष्टी अविभाज्य अशा दिसतात. माणसामाणसांतील विचारांची व भावनांची देवघेव ही बहुशः विशिष्ट ध्वनिबद्ध संकेतांच्या माध्यमातूनच होत असते. हे माध्यम किंवा ही भाषा माणूस गृहीत धरून चालतो. तथापि अभ्यासकाला किंवा सामान्य माणसालाही, तत्संबंधी अनेक कुतूहले असू शकतात. भाषा म्हणजे नेमके काय, ह्या भाषेला प्रारंभ कसा झाला, विशिष्ट ध्वनींना विशिष्ट अर्थ केव्हा व कसे प्राप्त होतात, जगात बोलल्या जाणाऱ्या शेकडो भाषांपैकी काही वेळा दोन भाषा एकमेकींहून अतिशय भिन्न तर काही वेळा दोनचार भाषा बऱ्याचशा मिळत्याजुळत्या दिसतात त्या का, असे कितीतरी प्रश्न उद्भवतात. गेली कित्येक वर्षे ह्या प्रश्नांची उत्तरे माणसे शोधीत आहेत. निरनिराळ्या उत्तरांतून त्या विषयाच्या अभ्यासात निरनिराळी मते, पंथ व संप्रदायही निर्माण झाले आहेत. त्या सर्वांचा आढावा काही मोठ्या व्याप्तिलेखांतून घेतला जाईल व इतर अनेक लहानमोठ्या नोंदींतून आवश्यक ती इतर माहिती आवश्यक तेवढ्या तपशिलात दिली जाईल.

जगातील बऱ्याच भाषा ह्या नुसत्या बोलल्या जात नसून लिहिल्या जातात. त्या लिहिण्याचे प्रकारही विविध आहेत. त्या प्रत्येक प्रकाराला आपण लिपी म्हणतो. येथेही कधी कधी काही दोन

चार लिप्या सारख्यासारख्या तर काही एकमेकींहून अगदी निराळ्या अशा दिसतात. भाषा व साहित्य ह्या विभागात लिप्या आणि त्यांची वैशिष्ट्ये ह्याबद्दलची सर्व माहिती देणे इष्ट होईल, म्हणून त्यासाठीही काही जागा दिलेली आहे.

तथापि, भाषेसंबंधी फक्त सर्वसाधारण अशी माहिती देऊन भागणार नाही. प्रत्येक भाषेचा व त्यातील साहित्याचा वेगळा अभ्यासही तितकाच आवश्यक आहे. म्हणून जगातील प्रत्येक महत्त्वाच्या भाषेसाठी व त्या भाषेतील साहित्यासाठी काही जागा ठेवलेली आहे. जगातील भाषा व साहित्य हा विषय, प्रत्येक भाषेवर एक व त्यातील साहित्यावर एक असे दोन व्याप्तिलेख व त्या भाषेतील ख्यातनाम साहित्यिक व प्रसिद्ध ग्रंथ यांच्यावरील अनेक लहान मोठी टिपणे अशा चार प्रकारच्या नोंदींमध्ये समाविष्ट केला जाईल. भाषा व साहित्य हे भाग परस्परांशी संबंधित तर आहेतच, परंतु त्यांचा सामाजिक जीवनाशीही निकटचा संबंध आहे. समाजाचा भौगोलिक परिसर, त्याचा जीवनावर होणारा परिणाम, भौतिक घडामोडी व स्थित्यंतरे, तात्त्विक, धार्मिक व अन्य वैचारिक प्रवाह, प्रणाली व आचारपद्धती या सर्वांचे दर्शन साहित्यातून घडत असते. प्रत्येक भाषेच्या साहित्यात काही आंतरिक प्रवाह व प्रवृत्ती दिसतात. हे प्रवाह व प्रवृत्ती त्या त्या साहित्यातील प्रमुख ग्रंथकारांच्या ग्रंथांतून कमीअधिक प्रमाणात अवतरत असतात. तथापि, काही ग्रंथकार व त्यांच्या कृती ह्यांमध्ये कोणत्याही प्रकारे समाजदर्शन घडत नाही व त्या केवळ अगदी स्वतंत्र अशा प्रज्ञेचे आविष्कार असण्याचा किंवा मानले जाण्याचा संभव आहे. म्हणून भाषा, साहित्य, ग्रंथकार व ग्रंथ अशा चार प्रकारच्या नोंदींतूनच भाषेचे व तिच्यातील साहित्याचे सम्यग्दर्शन घडू शकेल. प्रत्येक भाषेवरील व्याप्तिलेखात त्या त्या भाषेचा परिसर, भाषेचे स्वरूप, ती ज्या भाषिकगटात पडते तो गट व त्यातील तिचे स्थान, तिच्या विकासाचा संक्षिप्त इतिहास, ध्वनिविचार आणि लेखनपद्धती, शब्दभांडाराची जडणघडण, व्याकरणात्मक वैशिष्ट्ये, या गोष्टींचा आढावा घेतला जाईल. तसेच विशिष्ट भाषेतील साहित्यावरील व्याप्तिलेखात साहित्याचा सर्वसाधारण आढावा घेताना, अगदी आरंभापासून आजकालपर्यंतच्या इतिहासातील निरनिराळ्या कालखंडांतील स्थित्यंतरे दाखवून, त्याबरोबरच त्यांतील आंतरिक विचारप्रवाह, वाद, साहित्यप्रकार इत्यादींची दखल घेतली जाईल. त्या त्या भाषेतील साहित्यसंस्था, ग्रंथालये, अनुदाने, अशा स्वरूपाची उपयुक्त माहितीही व्याप्तिलेखांत अंतर्भूत केली जाईल किंवा सुलभ संदर्भासाठी क्वचित स्वतंत्र नोंदींतूनही दिली जाईल. व्याप्तिलेखातील माहिती त्या साहित्याच्या सर्वसाधारण गुणवैशिष्ट्यांबद्दलची असेल. शिवाय प्रमुख ग्रंथकार व काही युगप्रवर्तक असे ग्रंथ यांच्या स्वतंत्र नोंदी केल्या जातील. हे ग्रंथकार व त्यांचे ग्रंथ हे कधी विशिष्ट प्रवाहाचे प्रतिनिधी असतील तर कधी प्रवाहाचे प्रतिनिधी नसतील, तर कधी प्रवाहाबरोबर, प्रवाहाच्या बाजूला किंवा प्रवाहाच्या विरुद्धही जाऊन, स्वतःच्या मौलिकतेवर आधार ठेवून काही वेगळे, स्वतंत्र प्रयत्न करणारे, असे असतील. प्रत्येक साहित्यातील अशा प्रमुख ग्रंथकारांच्या नोंदी ग्रंथकारांच्या महत्त्वाप्रमाणे नऊ-दहा ओळींपासून दोन-तीन पृष्ठांपर्यंत असतील. अशा नोंदींतून त्या ग्रंथकाराविषयी जन्ममृत्यूच्या तारखा, शिक्षण वगैरे स्वरूपाची योग्य त्या प्रमाणात व्यक्तिचरित्रात्मक माहिती तर येईलच, परंतु एकंदर वाङ्मयीन इतिहासातील त्याचे कार्य व स्थान काय हेही सांगितले जाईल. साहित्याच्या इतिहासात 'शाकुंतल' किंवा 'हॅम्लेट' सारखे काही विशिष्ट ग्रंथही स्वतंत्र विचार करण्याच्या योग्यतेचे ठरतात. व्याप्तिलेखांतून त्यांचे उल्लेख अनुषंगाने होऊन जातील. ग्रंथकारांवरील नोंदींतही त्यांच्या प्रमुख ग्रंथांचा विचार जाता जाता होईल. मात्र तरीही काही विशिष्ट ग्रंथांची स्वतंत्रपणे व तपशीलवार माहिती येणे आवश्यक ठरेल. यासाठी काही साहित्यांतील काही प्रमुख ग्रंथांच्या नोंदी वेगळ्या दिल्या जातील. व्याप्तिलेखांत किंवा ग्रंथकारांच्या नोंदींखाली यांचा विचार विस्ताराने केला असेल तर द्विरुक्ती टाळली जाईल. परंतु या दोनही विभागांत पुरेशी माहिती न आली तर ग्रंथांसंबंधी योग्य ती माहिती ग्रंथनामांच्या नोंदींत स्वतंत्रपणे येईल. यांत त्या ग्रंथाचा कर्ता, काल वगैरे आवश्यक ती माहिती दिल्यानंतर, स्थलमर्यादेत शक्य होईल तेवढे टीकात्मक विवेचन व मूल्यमापन

केले जाईल. जुन्या ग्रंथांच्या बाबतीत हस्तलिखिते, प्रती, सटीक आवृत्त्या वगैरे इतर आवश्यक ते तपशीलही पुरविले जातील.

मराठी भाषा व साहित्य हा विभाग मराठी विश्वकोशाच्या दृष्टीने साहाजिकच विशेष महत्त्वाचा धरून त्यास सर्वांत जास्त म्हणजे १७५ पृष्ठे दिली आहेत. संस्कृत भाषा व साहित्याचे स्थान, भारतीय संस्कृती व मराठी भाषा, ह्यांच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे आहे. म्हणूनच शंभराहून अधिक पृष्ठे या प्राचीन भाषेस दिली आहेत. आणि त्याच दृष्टीने प्राकृत भाषांनाही ७५ पृष्ठे दिली आहेत. इंग्रजी भाषा व साहित्य यांचा आधुनिक मराठीवर फार मोठा आणि क्रांतिकारक परिणाम घडून आला आहे. इंग्रजीचे भारताच्या व महाराष्ट्राच्या जीवनातील स्थान लक्षांत घेऊनच त्यास १२५ पृष्ठे दिली आहेत. त्यानंतर इतर भाषा व साहित्य यांनाही, भाषावैशिष्ट्य, त्या प्रमाणे साहित्याचे वैशिष्ट्य व वैपुल्य लक्षात घेऊन योग्य प्रमाणात पृष्ठे दिली आहेत. इतर जागतिक भाषांपैकी अधिक महत्त्वाच्या भाषा व साहित्यावरील नोंदी, भाषा-व्याप्तिलेख, साहित्य-व्याप्तिलेख, प्रमुख ग्रंथकार व प्रमुख ग्रंथ अशा चारही प्रकारच्या होतील; तर कमी महत्त्वाच्या भाषा व साहित्यांची माहिती एकदोन विस्तृत लेखांतच सामावण्यात येईल.

साहित्याप्रमाणे साहित्यसमीक्षा म्हणजे काय हे स्पष्ट करणारे मूलभूत स्वरूपाचे मोठे लेख येतील. त्यांत साहित्यावरील आजवरच्या व्यासंगातून निष्पन्न झालेल्या सिद्धांतांचा व वादांचा परिचय करून दिला जाईल. आधुनिक साहित्यसमीक्षा जवळजवळ सर्वस्वीच पाश्चिमात्य जगातील मते व संप्रदाय ह्यांच्या अनुरोधाने सांगितली जाते. म्हणूनच क्लॅसिसिझम्, रोमॅन्टिसिझम्, मॉडर्निझम् अशांसारख्या लहानमोठ्या लेखांतून यूरोपीय साहित्यसमीक्षा अधिक स्पष्ट केली जाईल. तथापि, संस्कृतादी जुन्या संपन्न भाषांतील साहित्यसमीक्षाविषयक विचारांनाही योग्य ते स्थान दिले जाईलच आणि प्रादेशिक गरज लक्षात घेऊन मराठीतील समीक्षेला थोडे अधिक महत्त्व देणेही उचित ठरेल असे वाटल्यामुळे त्याप्रमाणे तरतूद केली आहे.

विश्वकोशात साहित्य आणि समीक्षा ह्यांवरील विस्तृत व्याप्तिलेख, जगातील निरनिराळ्या भाषांतील साहित्यांवरील लेख ह्यांखेरीज कथा, कादंबरी, नाटक, काव्य, चरित्र इत्यादी जे लहान-मोठे साहित्यप्रकार आहेत त्यांपैकी प्रत्येक प्रकाराचा एकेका स्वतंत्र लेखातून विकास दाखवून त्या प्रकारांची वैशिष्ट्ये स्पष्ट करण्यात येतील. साहित्यप्रकारांचा इतिहास हा एकंदर जागतिक वाङ्मय लक्षात घेऊन देण्यात येणार असला; तरी सर्वसामान्य मराठी वाचकांची व वाङ्मयाभ्यास-कांचीही पार्श्वभूमी लक्षात घेऊन इंग्रजी, संस्कृत व मराठी साहित्यांतील त्या विशिष्ट वाङ्मय-प्रकाराच्या विकासाला जास्त महत्त्व देण्यात येईल.

वर वर्णन केल्याप्रमाणे विविध नोंदींतून भाषा व साहित्य ह्यांविषयीची जास्तीत जास्त माहिती आली, तरीही साहित्याच्या क्षेत्रात इतर अनेक साहित्यांशी संबंधित अशा कमीअधिक महत्त्वाच्या विषयांची माहिती आजच्या जगात आवश्यक झालेली आहे; म्हणूनच कोश, भाषांतर, साहित्यिक संस्था, साहित्यिक पारितोषिके अशांसारख्या अनेक संकीर्ण नोंदींसाठी काही जागा राखून ठेवली आहे.

साहित्यविषयक सर्वसामान्य विषयांत आणखी एक अत्यंत महत्त्वाचा विषय अंतर्भूत करणे आवश्यक आहे; तो म्हणजे वृत्तपत्रव्यवसाय. हा विषय फक्त साहित्याच्या क्षेत्रातला आहे असे नाही, सामाजिक जीवनाच्या इतर अनेक अंगांशी तो निगडित आहे. तथापि, सोईसाठी त्याची व्यवस्था ह्या विभागात केली आहे. वृत्तपत्रव्यवसाय हा विषय मुख्यतः वृत्तपत्रव्यवसायाचे स्वरूप व इतिहास, नियतकालिके अशा मोठ्या व्याप्तिलेखांतून सांगितला जाईल. शिवाय वृत्तसंस्था, वृत्तसंघटना, सेन्सॉर, बातमीदार अशा अनेक लहानमोठ्या नोंदींतून त्या विषयांवरील बारीक-सारीक तपशिलांची माहिती पुरविली जाईल.

भाषा व साहित्य ह्या विभागात किती विषय कशा प्रकारे घेतले जातील ह्याची वर कल्पना दिलीच आहे. स्थूलमानाने विषयाचे विभाग व विभागवार पृष्ठसंख्या खालीलप्रमाणे राहील.

**जगातील भाषा व साहित्य (पृष्ठे १७५०)**

*(अ) भाषाशास्त्र (पृष्ठे १८०)*

**१. भाषाशास्त्र :**
व्याप्ती, इतिहास इत्यादी.

**२. भाषा :**
स्वरूप, उगम, इतिहास इत्यादी.

**३. भाषाकुल व गट :**
कल्पना, विभागणी, प्रमुख भाषाकुले व गट, महत्त्वाच्या भाषाकुलांची व गटांची वेगवेगळी माहिती.

**४. संकीर्ण :**
भाषेचे अध्ययन, द्विभाषिकत्व व बहुभाषिकत्व अशा स्वरूपाचे विविध विषय, विशिष्ट संज्ञांची स्पष्टीकरणे, अभारतीय व भारतीय भाषाशास्त्रज्ञांवर परिचयात्मक नोंदी वगैरे.

*(आ) जगातील भाषा व साहित्य (पृष्ठे १३००)*

**१. मराठी :** १७५

**२. इंग्रजी :** १२५

**३. संस्कृत व प्राकृत :** १५०
संस्कृत १०५
प्राकृत ४५
(पाली, अपभ्रंश, मागधी इत्यादी)

**४. आधुनिक भारतीय भाषा (मराठी खेरीज) :** ३०५
आसामी, बंगाली, गुजराथी, हिंदी, उडिया, पंजाबी, सिंधी, तामीळ, तेलगु, मल्याळी, कन्नड, काश्मिरी, खासी, पहाडी वगैरे सर्व महत्त्वाच्या भाषा; निरनिराळ्या बोली आणि आदिवासींच्या भाषा.

**५. यूरोपीय भाषा (इंग्रजी खेरीज) :** ३८०
इटॅलियन, स्पॅनिश, फ्रेंच, पोर्तुगीज, रशियन, चेक, पोलिश, सर्बो–क्रोॲशियन, बल्गेरियन, जर्मन, डच, फ्लेमिश, स्वीडिश, डॅनिश, नॉर्वेजियन, लॅटिन, ग्रीक, हंगेरियन फिनिश, एस्टोनियन, लिथुआनियन इत्यादी.

**६. आशियाई भाषा : (भारतीय भाषांखेरीज)** १००
अरबी, फार्सी, तुर्की, अक्केडियन, हिट्टाईट, चिनी, जपानी, कोरियन, ऐनु, सयामी, ब्रह्मी, मले, नेपाळी, इंडोनेशियन इत्यादी.

**७. अमेरिकन इंडियन भाषा :** १०

**८. आफ्रिकन मूळ भाषा :** २०

**९. संकीर्ण :** ३५
(वरील १ ते ८ यांमध्ये येणाऱ्या भाषांखेरीज)

**एकूण १३००**

*(इ) लिपी : (पृष्ठे ३०)*
[वरील (आ) मधील भाषांच्या लिप्यांची साधारण माहिती संबंधित भाषांवरील व्याप्तिलेखांत येईलच.]

**१. लिपी :**
उगम, प्रकार, इतिहास, संख्यालेखन इत्यादी.

**२. भारतीय लिपी :**
ब्राह्मी, खरोष्ठी, देवनागरी, गुजराथी, बंगाली, गुरुमुखी, मोडी, तामीळ, तेलगु, कन्नड, मल्याळी, उडिया, उर्दू, मोहेन्‌जोदारोची लिपी, इत्यादी सर्व महत्त्वाच्या जुन्या व चालू लिप्या.

**३. अभारतीय लिपी :**
हायरॉग्लिफिक, क्युनिफॉर्म, फिनिशियन, हिब्रू, अरबी, चिनी, जपानी, फार्सी, ग्रीक, रोमन, रशियन, इत्यादी सर्व महत्त्वाच्या जुन्या व चालू लिप्या.

*(ई) साहित्यसमीक्षा (पृष्ठे ६०)*
विषयस्वरूप, इतिहास, वाद व संप्रदाय; प्रमुख समीक्षकांवरील चरित्रात्मक टिपणे व साहित्यसमीक्षांतर्गत संकीर्ण विषय.

*(उ) साहित्य प्रकार : (पृष्ठे ७०)*
काव्य, नाटक, कादंबरी, कथा, चरित्र, निबंध इत्यादी साहित्यप्रकारांचे स्वरूप, विकास व सद्यःस्थिती.

*(ऊ) साहित्याशी संबंधित संकीर्ण विषय (पृष्ठे ११०)*

**१. वृत्तपत्रव्यवसाय :** ४०
विषयस्वरूप, इतिहास, नियतकालिके व त्यांचे प्रकार, वृत्तसंस्था, वार्ताहर, मुद्रण-स्वातंत्र्य, सेन्सॉर, इत्यादी लहान मोठे विषय.

**२. संकीर्ण :** ७०
साहित्यसंस्था, साहित्यिक पारितोषिके, अनुदाने, शब्दकोश, विश्वकोश, सांवत्सरिके, सेन्सॉर, भाषांतर, रूपांतर इत्यादी साहित्यासंबंधी सामान्य विषय.

**ललितकला :**

मानव्यविद्या कक्षेतील ह्या तिसऱ्या विभागासाठी विश्वकोशाची ९०० पृष्ठे आहेत. समाजातील साहित्याप्रमाणेच चित्रकला, वास्तुकला, संगीत, नृत्य इत्यादी ललितकलांतूनही समाजाचे जीवन दिसत असते; त्याच्या आशा आकांक्षा व्यक्त होत असतात. त्याचप्रमाणे पुष्कळदा ग्रंथकाराप्रमाणे ललितकलाकारही आपल्या स्वतंत्र प्रज्ञेतून समाजातील अशा निराळ्याच विश्वात स्वतः जातो व इतरांनाही नेतो. हे सर्व ललितकलांमधून साहित्यापेक्षा निराळ्या प्रकारे पण पुष्कळदा अधिक परिणामकारकपणेही झाल्यासारखे दिसते. अंशतः जो समाज ह्या कला निर्माण करतो, त्याची सर्वांगीण माहिती निरनिराळ्या सामाजिक विज्ञानांखाली व त्या प्रत्येक समाजाच्या साहित्यावरील लेखांतून दिल्यानंतर, ललितकलांची पार्श्वभूमी सांगण्यासाठी म्हणून अधिक जागा अडविण्याची गरज उरत नाही. तथापि, ह्या प्रत्येक कलाप्रकाराचे स्वरूप सांगितले जाणे आवश्यक आहे. ह्या प्रत्येक कलेचा तांत्रिक भाग व कलाकृतीमागील विविध प्रेरणा समजल्या गेल्या पाहिजेत. ह्या सर्व गोष्टी विचारात घेऊन ललितकलांसाठी एवढी जागा ठेवली आहे. निरनिराळे कलाविषय सुस्पष्ट व परिणामकारक स्वरूपात मांडण्यासाठी, ह्या विभागात साहजिकच भरपूर चित्रे व आकृत्या घालाव्या लागतील. ह्या विभागाची पृष्ठसंख्या निश्चित करताना ही विशेष गरज लक्षात घेतलेली आहे.

विश्वकोशात इतर विषयांप्रमाणेच ललितकलांचा आढावाही अकारविल्हे नोंदींतूनच घेतला जाणार आहे. म्हणून ह्याही विभागात प्रत्येक कलेची व्याख्या देऊन तिचा ऐतिहासिक विकास दाखवून, तिचे तपशीलवार स्वरूप सांगणारे काही व्याप्तिलेख येतील. ह्याचबरोबर कलेचे निश्चित स्वरूप, कलानिर्मितीतील व तिच्या रसग्रहणातील तात्त्विक, सामाजिक व मानसशास्त्रीय अंगांचे विवेचन, विविध कलांचे एकमेकींशी असलेले संबंध, ह्या सर्व गोष्टी स्पष्ट करण्यासाठी 'कला' ह्या शीर्षकाचा एक विस्तृत व्याप्तिलेख व विविध कलाशैलींवर लहानमोठे लेख आयोजित केले आहेत.

आशियातील कला, आफ्रिकेतील कला, पाश्चात्य कला ह्यांसारख्या नोंदी प्रादेशिक कला-वैशिष्ट्ये स्पष्ट करण्यासाठी योजलेल्या आहेत. तर दृक्प्रत्ययी कला, कालप्रत्ययी कला ह्यांसारख्या नोंदी, प्रादेशिक सीमा ओलांडून जगभर कमी अधिक प्रमाणात मान्य झालेल्या अशा कलापंथांसाठी घेतलेल्या आहेत. वास्तुकलेसारख्या कलांच्या क्षेत्रात कलावंताइतकाच तंत्रज्ञही महत्त्वाचा असतो. म्हणून अशा कित्येक नोंदी ह्या, विज्ञान व तंत्र कक्षेकडून आवश्यक ती तांत्रिक माहिती घेऊन परिपूर्ण केल्या जातील.

प्रत्येक कलेतील महत्त्वाच्या तांत्रिक संज्ञांशी वाचकांचा परिचय व्हावा म्हणूनही अनेक लहान लहान टिपणवजा आणि कधी कधी तर शब्दार्थवजा नोंदी कराव्या लागतील. तसेच कलेच्या सर्व क्षेत्रांतील जुन्या नव्या सर्व प्रतिथयश व्यक्तींच्या व्यक्तिचरित्रात्मक नोंदीही अर्थात येतीलच. 'ताजमहाल' सारख्या जगप्रसिद्ध कलाकृतींवरही स्वतंत्र नोंदी होतील. ललितकलांची अधिक माहिती देशनामांच्या नोंदींमधून, त्या त्या देशातील कलाजीवनाची माहिती देणाऱ्या परिच्छेदांतून येईल. मूर्तिकला, संगीत, चित्रकला, नृत्य अशांसारख्या कला आणि धातूचे कलाकाम, फर्निचर वगैरेंसारख्या कारागिरी ह्यांतील फरक सहज लक्षात येण्यासारखा आहे. पहिल्या प्रकारात मूलभूत विश्वदर्शनाचा किंवा जीवनदर्शनाचा यत्न असतो; तर दुसऱ्यात, जीवनात आवश्यक व उपयुक्त अशा गोष्टींत काही कलात्मकता आणण्याचा प्रयत्न असतो. दुसऱ्या प्रकारात मूळ प्रेरणा कलावंताची नसून, काही उपयोगी वस्तू निर्माण करणाऱ्या व्यवहारी कारागिराचीच असते. तथापि, त्यातील कलेचा भाग नजरेआड करण्यासारखा नसतो. हे सर्व लक्षात घेऊन ह्यास लघुकला असे संबोधले आहे. अशा अनेक विविध कलाप्रकारांची माहिती लहानमोठ्या नोंदींतून दिली जाईल.

ललितकलाविषयक तात्त्विक माहितीबरोबरच निरनिराळ्या कलांचे शिक्षण देणाऱ्या जगातील, भारतातील व महाराष्ट्रातील संस्था, संग्रहालये व ललितकलांशी संबंधित असे इतर अनेक संकीर्ण विषयही, त्यांच्या महत्त्वाच्या प्रमाणात सांगण्यात येतील. सर्वसाधारणपणे, प्रत्येक ललितकलेची

व्यवस्था अशा प्रकारे लागणार असली, तरी प्रत्येक कलाप्रकाराच्या वैशिष्ट्यानुसार त्याची तपशीलवार आखणी निरनिराळीच राहील.

ह्या विभागातील प्रत्येक ललितकलेची भागवार विभागणी व पृष्ठसंख्या खालीलप्रमाणे राहील.

### कला (सामान्य) (पृष्ठे ७०)

१. **कला : सर्वसामान्य** १५
व्याख्या, विषयस्वरूप, विविध कलाप्रकार व त्यांचे परस्परसंबंध; कलेच्या निर्मितीमागील व रसग्रहणातील निरनिराळ्या सामाजिक व तांत्रिक बाजूंची चिकित्सा.

२. **कला : इतिहास** १५
आदिमानवकाल, ईजिप्त, ग्रीस, भारत वगैरे प्राचीन संस्कृतींचे काल; मध्ययुग, प्रबोधन काल, औद्योगिक क्रांतीनंतरचा काल, अत्याधुनिक काल वगैरे ऐतिहासिक कालखंडांतील कलेचे स्वरूप.

३. **कला : प्रादेशिक व सांस्कृतिक** १०
यूरोपीय कला, भारतीय कला, जपानी कला वगैरे प्रादेशिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये दाखविणाऱ्या नोंदी. निरनिराळ्या देशांतील व संस्कृतींतील जीवनावरील व्याप्तिलेखांतून घेतलेला त्या त्या ठिकाणच्या कलांचा आढावा.

४. **कला : पंथ** १५
वास्तववाद, अतिवास्तववाद, इत्यादी विचारप्रवाहांची व तंत्रांची चिकित्सा.

५. **संकीर्ण :** १५
कलाशिक्षण, कलासंस्था, कलासाहित्य वगैरे विविध विषय; कलाविषयक विशिष्ट संज्ञांची स्पष्टीकरणे; प्रमुख कलावंत व कलासमीक्षक ह्यांवरील चरित्रात्मक टिपणे इत्यादी.

### चित्रकला (पृष्ठे १००)

१. **चित्रकला : सर्वसामान्य** ५
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप, इतर ललितकला, साहित्य, सामाजिक शास्त्रे व विज्ञानाशी संबंध इत्यादी स्वरूपाचे विवेचन; तांत्रिक बाजू.

२. **चित्रकला : इतिहास** १५
आदिमानव काल, ईजिप्त, ग्रीस वगैरे प्राचीन संस्कृतींचे काल; मध्ययुग, प्रबोधनकाल, अर्वाचीन काल वगैरे ऐतिहासिक कालखंडांतील चित्रकलेचे स्वरूप.

३. **चित्रकला : प्रादेशिक व सांस्कृतिक** २०
यूरोपीय कला, आशियाई कला, इस्लामी कला वगैरे स्वरूपाच्या नोंदी. निरनिराळ्या देशांतील व संस्कृतींतील जीवनावरील व्याप्तिलेखांतून घेतलेल्या त्या त्या ठिकाणच्या चित्रकलेचा आढावा.

४. **चित्रकला : प्रकार** १०
प्रयुक्त कला, पोस्टर, निसर्गचित्र वगैरे विविध विषय.

५. **चित्रकला : पंथ** २०
घनप्रत्ययी, दृक्प्रत्ययी, बिंदुप्रत्ययी इत्यादी कलापंथांचे आलोचन.

६. **चित्रकला : भारतीय** १५
प्राचीन, मध्ययुगीन वगैरे ऐतिहासिक कालखंडांतील भारतीय चित्रकलेचे समालोचन; कांग्रा, पाहाडी, राजपुतानी, मोगल इत्यादी चित्रकलापद्धतींचे विवेचन; सद्यःस्थिती.

७. **संकीर्ण :** १५
चित्रसंरक्षण, चित्रकला-शिक्षण, चित्रकलासंस्था वगैरे विविध विषय; चित्रकलांतर्गत विशिष्ट संज्ञांची स्पष्टीकरणे व प्रसिद्ध चित्रकारांवरील चरित्रात्मक टिपणे.

### वास्तुकला (पृष्ठे १००)

१. **वास्तुकला : सर्वसामान्य** ५
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप; इतर ललितकला, साहित्य, सामाजिकशास्त्रे व विज्ञानाशी संबंध इत्यादी स्वरूपाचे विवेचन; तांत्रिक बाजू.

२. **वास्तुकला : इतिहास** २०
आदिमानवकाल, ईजिप्त, बॅबिलोनिया, ग्रीस वगैरे प्राचीन संस्कृतींचे काल; तसेच, मध्ययुग, प्रबोधनकाल, आधुनिक काल, वगैरे ऐतिहासिक कालखंडांतील वास्तुकलेचे स्वरूप.

**३. वास्तुकला : प्रादेशिक व सांस्कृतिक** १५
यूरोपीय वास्तुकला, आशियाई वास्तुकला, इस्लामी वास्तुकला वगैरे स्वरूपांच्या नोंदी. निरनिराळ्या देशांतील व संस्कृतींतील जीवनावरील व्याप्तिलेखांतून घेतलेला त्या त्या ठिकाणच्या वास्तुकलेचा आढावा.

**४. वास्तुकला : प्रकार** १०
नगररचनाशास्त्र, स्थलशिल्प, शैक्षणिकसंस्था, ग्रंथालये, रंगमंदिरे, चित्रपटगृहे, मनोरे वगैरेंची वास्तुकला.

**५. वास्तुकला : पंथ** १०
आर्ट नुव्हो, कन्व्हेनशॅनॅलिझम्, आंतरराष्ट्रीय पद्धती वगैरे पंथांचे समालोचन.

**६. वास्तुकला : भारतीय** २०
प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक वगैरेंसारख्या निरनिराळ्या ऐतिहासिक अवस्थांचे समालोचन; दाक्षिणात्य, मोगल इत्यादी पद्धतींचे विवेचन.

**७. संकीर्ण :** २०
वास्तुकलाशिक्षण, वास्तुकलासंस्था, वास्तुकलांतर्गत विशिष्ट संज्ञांची स्पष्टीकरणे व प्रसिद्ध वास्तुकलाकारांवरील चरित्रात्मक टिपणे.

## मूर्तिकला (पृष्ठे १००)

**१. मूर्तिकला : सर्वसामान्य** ५
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप. इतर ललितकला, साहित्य, राजकीय शास्त्रे व विज्ञानाशी संबंध इत्यादी स्वरूपाचे विवेचन; तांत्रिक बाजू.

**२. मूर्तिकला : इतिहास** १५
आदिमानवकाल, ईजिप्त, ग्रीस, रोम वगैरे प्राचीन संस्कृतींचे काल; तसेच मध्ययुग, प्रबोधनकाल, आधुनिक काल वगैरे ऐतिहासिक कालखंडांतील मूर्तिकलांचे स्वरूप.

**३. मूर्तिकला : प्रादेशिक आणि सांस्कृतिक** १५
निरनिराळ्या देशांतील व संस्कृतींतील जीवनावरील व्याप्तिलेखांतून घेतलेला त्या त्या ठिकाणच्या मूर्तिकलेचा आढावा.

**४. मूर्तिकला : प्रकार** १०
लेणी, पुतळे वगैरे विविध प्रकारांवरील लहानमोठ्या नोंदी.

**५. मूर्तिकला : पंथ** १०
सर्वसामान्य ललितकलांतील निरनिराळ्या पंथांचा आणि पद्धतींचा मूर्तिकलेवर झालेला परिणाम.

**६. मूर्तिकला : भारतीय** ३०
प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक वगैरेसारख्या निरनिराळ्या ऐतिहासिक अवस्थांचे समालोचन; दाक्षिणात्य वगैरे विविध पद्धतींचे विवेचन.

**७. संकीर्ण :** १५
मूर्तिकलाशिक्षण, मूर्तिकलासंस्था, मूर्तिकलांतर्गत विविध संज्ञांची स्पष्टीकरणे व प्रसिद्ध वास्तुकलाकारांवरील चरित्रात्मक टिपणे इत्यादी.

## संगीत (पृष्ठे १००)

**१. संगीत : सर्वसामान्य** १०
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप; संगीत आणि इतर कला, साहित्य, सामाजिक शास्त्रे व विज्ञान यांचे संबंध; तांत्रिक बाजू; वाद्ये, उपकरणे इत्यादी.

**२. संगीत : इतिहास** १०
संगीताचा उगम आणि आदिमानवाच्या कालापासून आधुनिक कालापर्यंतची स्थित्यंतरे.

**३. संगीत : प्रकार** ५
भावगीत, नाट्यसंगीत, चित्रपट संगीत, शास्त्रीय गायन, समूहगान; वाद्य, वाद्यवृंद इत्यादी प्रकारांवरील लहानमोठ्या नोंदी.

**४. संगीत : पद्धती** २५
यूरोपीय संगीतपद्धती, निरनिराळी प्रादेशिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये; प्रत्येक देशाच्या व संस्कृतीच्या जीवनावरील व्याप्तिलेखांतून घेतलेला त्या त्या ठिकाणच्या संगीताचा आढावा.

५. **संगीत : भारतीय** ४०
ऐतिहासिक समालोचन; उत्तर हिंदुस्थानी, दाक्षिणात्य वगैरे पद्धती; घराणी; श्रुती, स्वर, राग, ताल वगैरे व्यवस्था इत्यादी.

६. **संकीर्ण :** १०
संगीतशिक्षण, संगीतसंस्था, विशिष्ट संज्ञांची स्पष्टीकरणे, प्रमुख गायक, संगीतनियोजक आणि संगीत-समीक्षक ह्यांच्यावरील चरित्रात्मक टिपणे इत्यादी.

## नृत्य (पृष्ठे १००)

१. **नृत्य : सर्वसामान्य** १०
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप; संगीत, नाट्यादी ललितकलांशी संबंध; सामाजिक शास्त्रे व विज्ञानाशी संबंध; तांत्रिक बाजू; वाद्ये, वस्त्रे, अलंकार, उपकरणे इत्यादी.

२. **नृत्यकला : इतिहास** १०
नृत्यकलेचा उगम आणि आदिमानवाच्या कालापासून आधुनिक कालपर्यंतची स्थित्यंतरे.

३. **नृत्य : प्रकार व पद्धती** ३०
बॅले, वाल्ट्झ इत्यादी स्वरूपाच्या नोंदी; प्रत्येक देशाच्या व संस्कृतीच्या जीवनावरील व्याप्तिलेखांतून घेतलेला त्या त्या ठिकाणच्या नृत्यकलेचा आढावा.

४. **नृत्य : भारतीय** ४०
ऐतिहासिक समालोचन; मणिपुरी, कथ्थक, वगैरे पद्धती; प्रांतिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये.

६. **संकीर्ण :** १०
नृत्यशिक्षण, नृत्यसंस्था, विशिष्ट संज्ञांची स्पष्टीकरणे, प्रमुख नर्तकांवरील चरित्रात्मक टिपणे इत्यादी.

## रंगभूमी (पृष्ठे १००)

१. **रंगभूमी : सर्वसामान्य** १०
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप; रंगभूमी आणि संगीतनृत्यादी इतर कला; सामाजिकशास्त्रे आणि विज्ञान ह्यांचे संबंध.

२. **रंगभूमी : इतिहास** ५
प्राचीन कालापासून आधुनिक कालापर्यंतच्या रंगभूमीच्या निरनिराळ्या अवस्था.

३. **नाट्यप्रकार :** १०
मूकनाट्य, छायानाट्य, ऑपेरा इत्यादी विविध प्रकारांवरील लहान-मोठ्या नोंदी.

४. **रंगभूमी : प्रादेशिक व सांस्कृतिक** १५
प्रत्येक देशाच्या व संस्कृतीच्या जीवनावरील व्याप्तिलेखांतून घेतलेला त्या त्या ठिकाणच्या रंगभूमीचा आढावा.

५. **रंगभूमी : तंत्र** १०
रंगमंच व्यवस्था, अभिनय, दिग्दर्शन, रंगभूषा, ध्वनिव्यवस्था इत्यादी सर्व तांत्रिक विषय.

६. **रंगभूमी : भारतीय** ३०
ऐतिहासिक समालोचन; प्रादेशिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये इत्यादी.

७. **संकीर्ण :** २०
रंगभूमीविषयक शिक्षण, संस्था, परिषदा, संमेलने वगैरे विविध विषय; विशिष्ट संज्ञांची स्पष्टीकरणे आणि प्रमुख कलाकारांवरील चरित्रात्मक टिपणे.

## चित्रपट (पृष्ठे ६०)

१. **चित्रपट : सर्वसामान्य** ५
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप; चित्रपटकला, इतर कला, सामाजिक शास्त्रे व विज्ञान ह्यांचे संबंध.

२. **चित्रपट : इतिहास** ५
प्रारंभ व विकास.

३. **चित्रपट : प्रकार** ५
कथानकप्रधान चित्रपट, वृत्तपट, व्यंगचित्रपट, शैक्षणिक चित्रपट इत्यादी विविध प्रकार.

४. **चित्रपट : तंत्र** १५
अभिनय, छायाचित्रण, ध्वनिलेखन, दिग्दर्शन, वितरण वगैरे विविध विषय.

५. **चित्रपट : प्रादेशिक व सांस्कृतिक** १०

६. **चित्रपट : भारतीय** १५
ऐतिहासिक समालोचन, भाषावार वैशिष्ट्ये.

७. **संकीर्ण :** ५
चित्रपटकला शिक्षण, संस्था, विशिष्ट संज्ञांची स्पष्टीकरणे, प्रमुख कलावंतांवरील चरित्रात्मक टिपणे.

## वस्त्रे व भूषणे (पृष्ठे ७०)

१. **वस्त्रे व भूषणे : सर्वसामान्य** ७
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप, ऐतिहासिक समालोचन.

२. **अंगभूषा :** १०
अंगभूषापद्धती, अंजन, मेंदी, नखशोभन, कुंकुमतिलक यांसारख्या नोंदी.

३. **वास्तुशोभन :** १६
गृहसजावटीच्या निरनिराळ्या पद्धती, आकाशदिवा, झुंबर, पुष्पमाला, शय्या, यांसारख्या नोंदी.

४. **वस्त्रे :** १५
इतिहास, वस्त्रांचे प्रकार व पद्धती, शिवणकला इत्यादी.

५. **अलंकार :** ८
विविध तऱ्हेचे अलंकार, प्रादेशिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये

६. **सौंदर्यप्रसाधने :** ४
अत्तर, उटणे, साबण, स्नान वगैरे प्रकारच्या विविध नोंदी.

७. **संकीर्ण :** १०
वस्त्रे, भूषणे व सौंदर्यप्रसाधन-विषयक शिक्षण व संस्था; साधने, उपकरणे वगैरे विविध विषयांवरील लहानमोठ्या नोंदी आणि चरित्रात्मक टिपणे.

## लघुकला व कारागिरी (पृष्ठे १००)

१. **लघुकला व कारागिरी : सर्वसामान्य** २
व्याख्या, व्याप्ती व वैशिष्ट्ये.

२. **धातुकलाकाम :** १०
ऐतिहासिक समालोचन, सोनारकाम, कासे, पितळ, ब्रॉंझ वगैरे विविध धातूंच्या कारागिरींची माहिती, वैशिष्ट्ये वगैरे.

३. **कागदाचे कलाकाम :** ४
कागदी फुले, कागदी लगद्याचे कलाकाम, पुस्तकबांधणी वगैरे.

४. **विणकाम :** १८
ऐतिहासिक समालोचन, कशीदाकाम, भरतकाम, रेशीमकलाकाम, टॅपेस्ट्री वगैरे.

५. **मुद्रणकला :** ५
मुद्रणकलेचा इतिहास, ब्लॉक्सच्या विविध पद्धती इत्यादी.

६. **लाकडी कलाकाम :** ५
सुतारकाम, लाकडी खेळणी, फर्निचर व इतर वस्तू.

७. **काचेचे कलाकाम :** ६
काचेवरील चित्रकला, काचेचे रंगीत कलाकाम वगैरे.

८. **कुंभारकाम :** १०
ऐतिहासिक समालोचन, चिनी मातीचे काम वगैरे.

९. **छायाचित्रण :** ५
इतिहास, तंत्र, प्रकार इत्यादी.

१०. **इतर कलाकाम :** ३०
सोनारकाम, पुष्परचना, रांगोळी, बुरूडकाम, खेळणी, हस्तिदंती कलाकाम वगैरे.

११. **संकीर्ण :** ५
लघुकलांचे शिक्षण वगैरे विविध विषय आणि प्रसिद्ध लघुकलाकारांवर चरित्रात्मक टिपणे इत्यादी.

**खेळ व मनोरंजन :**

मानव्यविद्याक्षेत्रातील ह्या चौथ्या छोट्याशा विभागासाठी १०० पृष्ठे ठेवलेली आहेत. निरनिराळ्या खेळांची आणि मनोरंजनाच्या साधनांची माणसाला सर्वत्र आणि सर्वकाळ आवश्यकता वाटत आलेली आहे. त्यांची शरीराच्या स्वास्थ्यासाठी आणि आरोग्यासाठी जेवढी जरुरी आहे तेवढीच दैनंदिन धकाधकीच्या जीवनात काही वेळ विरंगुळा देण्यासाठी, कामाचा शीण कमी करण्यासाठीही आहे. सध्याच्या यंत्रयुगात मानवी जीवनाला जो एक विलक्षण ताण आणि वेग आला आहे त्यामुळे तर ही गरज विशेष तीव्रतेने भासते.

इतिहासकालातील व वर्तमानकालीन हजारो क्रीडाप्रकारांची आणि मनोरंजनाच्या साधनांची तपशीलवार माहिती ह्या मर्यादित पृष्ठसंख्येत देणे अर्थातच अशक्य आहे. तथापि, मूलतः माणसाच्या क्रीडाप्रवृत्तीचे स्वरूप समजणे आवश्यक आहे. खेळांतील स्पर्धावृत्तीचे नीट आकलन व्हावयास हवे. निरनिराळ्या क्रीडा आणि त्यांतून दिसणारी संस्कृती स्पष्ट झाली पाहिजे. खेळाचे प्रकार किती व कसे पडतात, निरनिराळ्या प्रकारांतून शारीरिक व्यायामाचा भाग किती व मनोरंजनाचा भाग किती, खेळ नियमबद्ध व संघटित का आणि कसे केले जातात, अशा सर्व बाजू समजल्या पाहिजेत. म्हणूनच 'खेळ' व 'शारीरिक शिक्षण' ह्यांसारख्या व्यापिलेखांतून अशा सर्व प्रश्नांची सांगोपांग चर्चा केली जाईल. ह्याखेरीज महत्त्वाच्या भारतीय आणि आंतरराष्ट्रीय खेळांवर लहान-मोठ्या नोंदी केल्या जातील.

ललितवाङ्मय आणि निरनिराळ्या ललितकला ह्यांखेरीज अनेक लहान मोठे मनोरंजनाचे प्रकार माणसाने निर्माण केले आहेत. 'सर्कस' आणि 'जादू' ही त्यांतली दोन मोठी उदाहरणे आहेत. अशा प्रकारांची माहिती मोठ्या लेखांतून सविस्तरपणे देण्यात येईल. ह्याखेरीज 'पोस्टाची तिकिटे जमविणे', 'सह्या गोळा करणे' असे नाना प्रकारचे छंद माणसे करीत असलेली दिसतात. ही छंदप्रवृत्ती स्पष्ट करण्यासाठी, छंदांचे सामाजिक विश्लेषण करण्यासाठी व त्यांचे प्रकार दाखविण्यासाठी एक व्यापिलेख योजिला आहे. त्याचबरोबर अनेक लोकप्रिय छंदांवर महत्त्वाप्रमाणे लहानमोठ्या स्वतंत्र नोंदी केल्या जातीलच.

ह्या विभागातील दोन विषयांपैकी प्रत्येकाची भागवार पृष्ठसंख्या साधारणपणे खालीलप्रमाणे राहील.

### खेळ (पृष्ठे ६५)

**१. खेळ : सर्वसामान्य** — १०
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप; खेळ व शारीरिक शिक्षण ह्यांचे ऐतिहासिक समालोचन; जीवनाच्या इतर अंगांशी संबंध.

**२. भारतीय व अभारतीय खेळ : मैदानी व बैठे** — ४५
हुतूतू, आट्यापाट्या, टेनिस, फुटबॉल, पत्ते, बुद्धिबळे वगैरे खेळांवरील लहानमोठ्या नोंदी; प्रत्येक खेळाचा संक्षिप्त इतिहास, नियम व महत्त्व; ऑलिंपिक स्पर्धा–तिचा इतिहास व जागतिक महत्त्व.

**३. संकीर्ण :** — १०
लंगडी, गोट्या वगैरेंसारखे मुलांचे खेळ; झिम्मा, फुगडी ह्यांसारखे स्त्रियांचे खेळ; क्रीडाशिक्षण, क्रीडा-संस्था, स्काऊट वगैरे विशेष संस्था आणि प्रसिद्ध खेळाडूंवरील चरित्रात्मक टिपणे इत्यादी.

### मनोरंजन (पृष्ठे ३५)

**१. मनोरंजन : सर्वसामान्य** — ३
व्याख्या, व्याप्ती, विषयस्वरूप; मानसशास्त्रीय आणि सामाजिक चिकित्सा; मनोरंजनांचे आणि छंदांचे प्राचीन आणि अर्वाचीन प्रकार.

**२. रंजनप्रकार आणि छंद :** — ३०
सर्कस, जादू, सहली, नौकाविहार, स्केटिंग, दारूकाम, पशूंच्या झुंजी, अशा अनेक प्रकारांवरील लहान-मोठ्या नोंदी.

**३. संकीर्ण :** — २
मनोरंजनाच्या विविध प्रकारांचे शिक्षण व संघटन; संबंधित प्रसिद्ध व्यक्तींवरील चरित्रात्मक टिपणे.

## विज्ञान व तंत्रविद्या कक्षा

विश्वकोशाची मानव्यविद्या ही एक कक्षा आणि विज्ञान व तंत्रविद्या ही दुसरी कक्षा कल्पिली आहे. मानव्यविद्यांची जशी सांगोपांग माहिती वर दिली तशीच आता विज्ञान व तंत्रविद्यांचीही द्यावयाची आहे. या दोन कक्षा ज्ञानव्यवस्था म्हणून वेगळ्या केल्या असल्या तरी त्या परस्परावलंबी असून त्या दोहोंमध्ये अनेक ठिकाणी लक्ष्मणरेषा अस्तित्वात नाहीत. कारण सर्व विद्यांचे व कलांचे उगमस्थान आणि लक्ष्य अंततः मानवच आहे. मनुष्याच्या इतिहासात विज्ञानेतिहासही समाविष्ट होतो. आणि विज्ञानेतिहासात मानवी कृतीचा इतिहास अंतर्भूत होतो.

भिन्नभिन्न सैद्धांतिक आणि अनुप्रयुक्त विज्ञाने आणि मानव्यविद्या या दोहोंमधले परस्परसंबंध अविभाज्य ठरतात. प्राकृतिक भूगोल, जीवविज्ञान, अनुवंशशास्त्र व वैद्यक यांचा संबंध मानवी भूगोल, सुप्रजाजनन, विवाहसंस्था, लोकांचे आरोग्य, लोकसंख्या इत्यादी सामाजिक विषयांशी अत्यंत निगडित आहे. जीवविज्ञान, वनस्पतिविज्ञान, कृषी, अभियांत्रिकी व तंत्रविद्या यांचा मानवी भूगोल, अर्थशास्त्र, समाजरचना, सामाजिक संस्था, औद्योगिक संघटना, सामाजिक सहकार्य व संघर्ष, युद्ध इत्यादी सामाजिक प्रश्नांमध्ये विचार करावा लागतो. म्हणून वर निर्दिष्ट केलेल्या दोन्ही कक्षांमधील विचार एकमेकांस पूरक आहेत व एकमेकांमध्ये कमीअधिक संदर्भात मिसळणारे आहेत, हे लक्षात ठेवावे लागते.

तथापि विज्ञान व तंत्रविद्या कक्षेचे अभ्यासविषय आणि विचारपद्धती बऱ्याच अंशी भिन्न आहेत. सर्वच ज्ञानसंपादनात एक तर्कदृढ अशी पद्धती असावी लागते; मानव्यविद्यांपेक्षा विज्ञानाच्या क्षेत्रातील विचारपद्धती दृढतर असते. मनुष्य हा बुद्धिवादी आहे हे एका अर्थाने खरे असले तरी बुद्धिवादाला अनेक वेळा विकारांची बाधा होते; बुद्धीला न पटणाऱ्या संस्कारांना तो वश होतो; त्याला स्वातंत्र्य प्रिय असले तरी सामाजिक बंधनांपुढे तो वाकतो. म्हणून मानवजीवनाचे विज्ञान निश्चित स्वरूपात बनविण्यात मानवाला यश येईल की नाही हे अजून सांगता येत नाही. नियमबद्ध अशा विश्व-व्यवस्थेतील एक जीवकोटी म्हणून मानवी जीवनाच्या शारीरिक व सांस्कृतिक अशा काही बाजूंचा विज्ञानाने काही प्रमाणात उलगडा करता येतो; विज्ञानपद्धती ते जीवन समजण्यास उपकारक ठरते. इंद्रियविज्ञान, मानसशास्त्र इत्यादी मानवविषयक विज्ञानेही उदयाला आली आहेत. परंतु जड वस्तू आणि मानवेतर जीवसृष्टी या क्षेत्रांतील विज्ञाने निश्चित नियमांच्या संशोधनात पुष्कळ प्रगत झाली आहेत. त्यामुळे सर्व विज्ञानांना मार्गदर्शक होणारी अशी विज्ञानपद्धती निर्माण झाली आहे. निरीक्षणाने वस्तूंचे सत्यस्वरूप पडताळणे, अनुभवावर आधारलेले त्यांचे कार्यकारणसंबंध बांधणे, आणि त्या कार्यकारणसंबंधांच्या अनुरोधाने भविष्यकालीन घटनांचा अंदाज घेणे यासंबंधी विशिष्ट प्रकारची विचारपद्धती म्हणजे विज्ञानपद्धती. ती या विश्वकोशात एका स्वतंत्र निबंधाच्या द्वारा मांडली जावयाची आहे. त्याचप्रमाणे या विज्ञानपद्धतीत गर्भित असलेले विज्ञानातील मूलभूत कल्पनांचे विवरण करणारे तत्त्वज्ञान म्हणजे विज्ञानाचे तत्त्वज्ञानही एका स्वतंत्र निबंधाच्या द्वारा या विश्वकोशात मांडले जावयाचे आहे.

विज्ञानाची थोडक्यात नेमकी व्याख्या करणे काहीसे कठीण आहे. मनुष्यास निश्चित असे वस्तुस्वरूप कळते व वस्तूंचे नियम कळतात; वस्तुस्वरूपाचे व वस्तूंच्या नियमांचे शब्दांनी वा संकेतांनी सुसंगत रीतीने व्यक्त केलेले ज्ञान म्हणजे विज्ञान होय. हे विशिष्ट प्रकारचे ज्ञान निरीक्षणाच्या द्वारा वा प्रयोगाच्या द्वारा अनुभवांनी मिळविलेले असते; हे अनुभव तपासून मनुष्य काही सिद्धांत बसवितो; त्या सिद्धांतांची परस्पर सुसंगत अशी मांडणी करतो. ही मांडणी म्हणजेच विज्ञान होय. अधिक स्पष्ट स्वरूपात सांगावयाचे म्हणजे विश्वाविषयी म्हणजे अवकाश व काल यांच्या संबंधांमध्ये ग्रथित असलेले द्रव्य व ऊर्जा, यांच्या स्वरूपांविषयी, गुणधर्मांविषयी, त्यांच्या अन्योन्यक्रियांविषयी व त्यांच्या रूपांतरांविषयी शब्दांनी व संकेतांनी मांडलेले ज्ञान म्हणजे विज्ञान होय.

विज्ञानाचे साधारणपणे दोन वर्ग केलेले आहेत. एक सैद्धांतिक व दुसरा अनुप्रयुक्त. भौतिकी, रसायनविज्ञान, जीवविज्ञान, भूविज्ञान, ज्योतिष इत्यादी सैद्धांतिक विज्ञाने होत. कित्येकांच्या मते, गणित व तर्कशास्त्र ही सैद्धांतिक विज्ञानांच्या मध्ये परिगणित होतात.

ऊर्जेच्या सर्व अभिव्यक्तींचा, द्रव्यांच्या स्वरूपांचा वा गुणधर्मांचा सर्वसामान्य विचार भौतिकीत केला जातो. म्हणून सर्व विज्ञानांत भौतिकी श्रेष्ठ व क्रमाने पहिली ठरते. रसायन विज्ञानात सर्व प्रकारच्या वस्तूंचे घटक अणू, रेणू, मूलद्रव्ये व संयुगे यांचा व त्यांच्या अन्योन्य-क्रियांचा प्रामुख्याने विचार होतो. परंतु भौतिकी व रसायन यांची सीमारेषा काटेकोरपणे वेगळी दाखविणे अशक्य आहे. जीवविज्ञानात सर्व सजीव द्रव्यांचा विचार केला जातो. वनस्पती व प्राणी दोन्हीही सजीव आहेत. तेव्हा या दोहोंचाही एकाच जीवविज्ञानात विषय या नात्याने विचार करणे इष्ट व अटळ आहे. परंतु वनस्पती व प्राणी यांची काही वैशिष्ट्ये लक्षात घेऊन सोयीसाठी वनस्पतिविज्ञान व प्राणिविज्ञान असे दोन भाग तज्ज्ञांनी कल्पिले आहेत. ही दोन विज्ञाने काही प्रमाणांत परस्परात अनुस्यूत होतात; एवढेच नव्हे तर काही वनस्पती प्राणी आहेत किंवा नाही हेही निश्चित करता येत नाही. त्यात प्राणी व वनस्पती यांच्या सीमारेषा एकमेकात एकरूप होतात. त्याप्रमाणे जीव काय आहे आणि जीव व अजीव द्रव्य यांचा कार्यकारणसंबंध पूर्णपणे कसा आहे, हे अद्याप न सुटलेले कोडे असले तरी ते सोडविण्याचे आटोकाट प्रयत्न वैज्ञानिक करीत असून त्यांत प्रगती होत आहे. केवळ द्रव्याचा किंवा ऊर्जेचा विचार करून जीवाच्या संपूर्ण स्वरूपाचा उलगडा अजून होऊ शकला नसला तरी जीवांचे, त्यांच्या क्रमविकासाचे आणि अजीव व सजीव यांच्या अन्योन्य संबंधांचे वैज्ञानिक पद्धतीने अनुसंधान करणे शक्य झाले आहे. ज्योतिष, भूविज्ञान, प्राकृतिक भूगोल इत्यादी विज्ञानांची कार्यक्षेत्रे एखाद्या संकुचित विषयापुरतीच मर्यादित आहेत. अथांग विश्वातल्या तेजोमेघांचे, ग्रहताऱ्यांचे किंवा धूमकेतुसारख्या वस्तूंचे अध्ययन करणे हे ज्योतिषाचे कार्य आहे. भूविज्ञानात पृथ्वीच्या कवचाचे, त्याच्या थरांचे व तत्संबंधी इतिहासाचे अनुसंधान केलेले असते.

विज्ञानांच्या अध्ययनाची प्रगती होत असताना आपल्या ज्ञानात जो जो भर पडत आहे तो तो त्या त्या विज्ञानाचे अवांतर भिन्न भिन्न विभाग निर्माण होत आहेत; ते विभाग परस्परावलंबी व परस्परपूरक असतात. त्यामुळे त्यांच्या सीमारेषा काटेकोरपणे दाखविणे अशक्य आहे, हे अलीकडील काळात उगम पावलेल्या जीवभौतिकी, भूभौतिकी, जीव–रसायन, भौतिकी रसायन, भू-रसायन यांसारख्या विज्ञानशाखांच्या नव्या संज्ञांवरून कळून येते. या विज्ञानशाखांचाही त्या वेगळ्या दाखविल्या नसल्या तरी तेथे योग्य ठिकाणी समावेश केला आहे. गणित व त्याची शाखा संख्यानक त्याचप्रमाणे तर्कशास्त्र यांचा विज्ञानात साधारणपणे समावेश करण्याची रीत नाही. गणित व तर्कशास्त्र मिळून विज्ञानाचा स्वतंत्र गट करावा असे कित्येक वैज्ञानिकांचे मत आहे. गणित व तर्कशास्त्र यांचे विज्ञानांतील कार्य सर्वव्यापी व मूलगामी असते; त्यांचा विज्ञानांत पदोपदी उपयोग करावा लागतो. असे असले तरी तर्कशास्त्राचा मानव्यविद्या कक्षेत समावेश करून गणित विषयाचा विज्ञान व तंत्रविद्या कक्षेत समावेश केला आहे.

विज्ञानांचा दुसरा वर्ग अनुप्रयुक्त विज्ञाने होत. सैद्धांतिक विज्ञानांचा विषय वस्तूंचे स्वरूप व वस्तूंचा कार्यकारणभाव किंवा परस्परसंबंध हा होय. तत्त्व शोधण्याकडे त्यांची प्रवृत्ती असते. सैद्धांतिक विज्ञानांचे मानवी जीवनाला साक्षात किंवा परंपरेने उपयुक्त होतील असे नियम अनुप्रयुक्त विज्ञानाचा विषय होत. वास्तवज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करून मनुष्याचे आणि समाजाचे जीवन व व्यवहार सोयीचे व सुखी करणे, गैरसोय नाहीशी करणे, हा या विज्ञान प्रकारांचा हेतू आहे. या ठिकाणी इतके मात्र लक्षात ठेवले पहिजे की अनुप्रयुक्त विज्ञानांमध्येही सैद्धांतिक विज्ञान समाविष्ट असतेच. ते सिद्धांत किंवा ती तत्त्वे मानवी उपयोगाशी संबद्ध असतात एवढाच अधिक गुण त्यांच्यात असतो. उदाहरणार्थ, कीटकविज्ञान किंवा सूक्ष्मजीवविज्ञान हे कीटक किंवा सूक्ष्मजीव यांच्या स्वरूपाचे, घटनेचे व कार्यकारणभावांचे सिद्धांत शोधूनच त्यांचा मानवी व्यवहाराशी

उपयोगद्वारा संबंध दाखवून देतात, हे संबंधसुद्धा सिद्धांतमयच असतात. म्हणून सैद्धांतिक विज्ञाने व्यवहारान्वित किंवा उपयोगान्वित अधिक प्रमाणात होतात एवढेच अनुप्रयुक्त विज्ञानांचे वैशिष्ट्य होय.

अनुप्रयुक्त विज्ञानांना तंत्रविद्या ही संज्ञा कित्येक देतात व त्यातच अभियांत्रिकी या अनुप्रयुक्त विज्ञानाच्या विशिष्ट शाखेचा समावेश करतात. उदाहरणार्थ, कित्येक ठिकाणी अभियांत्रिकी ही अनुप्रयुक्त भौतिकी होय असे म्हटले आहे, परंतु रासायनिक अभियांत्रिकी अशीही अनुप्रयुक्त विज्ञानाची एक शाखा प्रसिद्ध आहे. तंत्रविद्या व अभियांत्रिकी यांचे नेमके विभक्त स्वरूप सांगणे कठीण आहे. तरी कित्येकांनी अभियांत्रिकी व तंत्रविद्या असा स्पष्ट भेद केलेला आढळतो. विज्ञानाचा उपयोग करून इष्ट हेतू साध्य करून घेण्याच्या योजना, अभिकल्प व साधने निर्माण करणे हा अभियांत्रिकीचा विषय होय. आणि एखादी योजना सिद्धीस नेण्यासाठी आवश्यक असणारी उपकरणे व प्रक्रियापद्धती हा तंत्रविद्येचा विषय मानला जातो. सामान्यतः उद्योगधंद्यात वापरल्या जाणाऱ्या प्रक्रियांचे पद्धतशीर ज्ञान तंत्रविद्या होय. अभियांत्रिकी व तंत्रविद्या यांना प्रत्येकी सुमारे १,३०० पृष्ठे दिलेली आहेत.

प्रत्येक विज्ञानाचा उगम, प्रगती व एकंदरीत इतिहास आणि त्या त्या विज्ञानाच्या संशोधनाच्या आणि प्रगतीच्या कामी ज्यांनी महत्त्वाचे कार्य केले आहे अशा व्यक्तींची माहिती अथवा चरित्रे या विश्वकोशात वर्णिली आहेत. भिन्न भिन्न विज्ञाने किंवा विज्ञानशाखा यांच्यावरील व्याप्तिलेखांत त्यांचा इतिहास व तत्संबंधी व्यक्तींची माहिती दिली आहे. त्यांत परकीय व भारतीय वैज्ञानिकांचा समावेश केला आहे. विद्यमान विद्वानांचे व तंत्रविद्यांचे ज्ञान आपण मुख्यतः पश्चिमी वैज्ञानिकांकडून घेतले आहे व घेत आहोत. आधुनिक विज्ञानांचा इतिहास हा मुख्यतः पश्चिमी वैज्ञानिकांच्या कार्याचा इतिहास असे म्हणता येईल. इतिहासातील वर्णनाच्या ओघात आलेल्या वैज्ञानिकांच्या माहितीखेरीज प्रमुख वैज्ञानिकांची संपूर्ण चरित्रेही स्वतंत्र नोंदींच्या रूपाने दिली आहेत.

भारतातील व परदेशांतील प्रमुख वैज्ञानिक संस्था, प्रयोगशाळा, शिक्षणसंस्था व संग्रहालये यांची माहिती देणाऱ्या लेखांचाही समावेश यात केला आहे.

सर्वसाधारणपणे विज्ञान व तंत्रविद्या कक्षांतर्गत विषयांची व्यवस्था अशाप्रकारे लागणार असली तरी प्रत्येक विषयाच्या विशिष्ट गरजेप्रमाणे त्याची तपशीलवार रचना भिन्न भिन्न राहील. स्थूलमानाने प्रत्येक विषयाची पृष्ठसंख्या खालीलप्रमाणे राहील :—

**१. अंतरिक्षविज्ञान : २७ पृष्ठे**
कृत्रिम उपग्रह, अंतराळयानी अभियांत्रिकी, खगोलीय नौकानयन, आंतरग्रह परिचालन, अंतरिक्ष–उड्डाणविद्या व जीवविज्ञान.

**२. अभियांत्रिकी, अणुगर्भीय : २५ पृष्ठे**
अणुगर्भीय – इंधने, शक्ती, परिचालन, प्रक्रियक.

**३. अभियांत्रिकी, ऑटोमोबाइल : ४० पृष्ठे**
एंजिन; प्रेषण, इंधन, वंगण, विद्युत–योजना, बॉडी, चॅसिस, डॅशबोर्ड, स्टिअरिंग, इतर साधने, गतिरोधन इत्यादी.

**४. अभियांत्रिकी, खनिकर्म : २६ पृष्ठे**
खाणी व खाणकामे.

**५. अभियांत्रिकी, नाविक : ८५ पृष्ठे**
यंत्रसामग्री; नाविक एंजिने; जहाजे, बोटी, पाणबुड्या, इत्यादींची रचना व निर्मिती; परिचालन, नौकानयनपद्धती व उपकरणे; नाविक वास्तुशिल्प.

**६. अभियांत्रिकी, यांत्रिक : २३७ पृष्ठे**
व्याप्तिलेख; यंत्रांचे घटक, रचना, नियंत्रण, कार्यक्षमता; यांत्रिक व वायवीय उपकरणे व त्यांचे भाग; एंजिने व यंत्रांच्या परिचालन पद्धती व उपयोग.

**७. अभियांत्रिकी, रासायनिक : १२३ पृष्ठे**
व्याप्ती; एकक पद्धती; एकक प्रक्रिया; उच्च दाब, नीचतापमान व निर्वात तंत्रे; इंधने.

**८. अभियांत्रिकी, विद्युत : १४० पृष्ठे**
व्याप्ती; एकदिश आणि प्रत्यावर्तक विद्युत मंडल सिद्धांत व अभियांत्रिकी विद्युत धारित्र; विद्युत एकक; गृहोपयोगी उपकरणे, दिवे, जनित्रे, मोटार, रोहित्रे व प्रेषणपद्धती.

**९. अभियांत्रिकी, वैमानिक : ७२ पृष्ठे**
व्याप्ती, इतिहास; विमानांची एंजिने, वायुयानांची रचना, बांधणी व परीक्षण; विमान, विमान चालन, वैद्यकीय विचार.

**१०. अभियांत्रिकी, संदेशवहन : १२८ पृष्ठे**
विद्युतसंदेश, इलेक्ट्रॉन नलिका, ट्रँझिस्टर, संकेत-संदेश सिद्धांत, रडार, रेडिओ, तारायंत्र, दूरध्वनी व टेलिव्हिजन.

**११. अभियांत्रिकी, स्थापत्य : ३५१ पृष्ठे**
व्याप्ती; सर्वेक्षण; धरणे, पूल, घरे, इमारती, बोगदे; सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य, सांडपाणी पद्धती व रचना; रस्ते, हमरस्ते, हवाई मार्ग, सिमेंट, काँक्रीट, पोलाद व बांधकामाचे इतर पदार्थ; पाणीपुरवठा, कालवे, पूरनियंत्रण, जलविज्ञान, नदी नियंत्रण, नगररचना, मृदाप्रेरणाविज्ञान.

**१२. उद्योगधंदे व व्यापार : १,२७१ पृष्ठे**
अभियांत्रिकी उद्योग : लोखंड, पोलाद, यंत्रे, वाहने, अवजारे व इमारतकामासाठी लागणाऱ्या वस्तूंची निर्मिती; कृषिउद्योग : खाद्य व पेयपदार्थ, नैसर्गिक व कृत्रिम तंतू, वस्त्रेप्रावरणे इत्यादींची निर्मिती; रासायनिक उद्योग : अम्ले, अल्कली, अल्कोहोल, रंजकद्रव्ये, खते, औषधे, कीटकनाशके, प्रतिजैविक द्रव्ये, वंगणे, तेले, खनिजतेले रसायने, सौंदर्यप्रसाधने, प्लॅस्टिक इत्यादींची निर्मिती.

**१३. कीटकविज्ञान : ६६ पृष्ठे**
कीटकविज्ञान, आर्थिक, वैद्यकीय व वर्गीकृत; कीटक, कीटकांचे वर्गीकरण. कीटकांची वर्णने; मनुष्य, गुरे आणि वनस्पती यांना अपाय करणारे कीटक आणि त्यांचे नियंत्रण.

**१४. कृषिविज्ञान : ३६५ पृष्ठे**
व्याप्ती, इतिहास, शेतकी, मृदांचे प्रकार–जागतिक व भारतीय; मृदासंरक्षण, मृदाउद्धार, मृदाक्षरण; मशागत, मशागती पिके; धान्ये, कडधान्ये, गळिताची पिके; भाजीपाले, फळे व फुले; साखरेची, मसाल्याची व तंतूंची पिके; वैरणीची पिके, पिकांचे संरक्षण; शिंपणे; खते, जोरखते; दुर्जल शेती, मिश्र शेती; शेतीची अवजारे, शेतीवरील बांधकामे, वनस्पतिप्रजनन, शेती शिक्षण, जोडधंदे, शेतकी संस्था व प्रचार, पशुसंवर्धन.

**१५. खनिजनिक्षेप : ८७ पृष्ठे**
खनिज तेल व कोळसा, धातुक निक्षेप व त्यांची वर्णने, उपयुक्त खनिज वर्णने, खनिज शिरा, रत्ने, खनिज संपत्ती–पृथ्वीवरील व भारतातील.

**१६. गणित : २५१ पृष्ठे**
गणितशास्त्राची मूलतत्त्वे, इतिहास, उपयुक्तता; अंकगणित बीजगणित, भूमिती; गणितीय विश्लेषण व कलनशास्त्र; गणिती यंत्रे, चरित्रे.

**१७. ज्योतिषशास्त्र : १५७ पृष्ठे**
व्याप्तिलेख; विश्वस्थितिशास्त्र, विश्वोत्पत्तिशास्त्र; वेधशाळा; ज्योतिषशास्त्रीय संज्ञा, उपकरणे; खगोलीय भौतिकी; खगोलस्थ गोलग्रह, तारे, तारकापुंज, तेजोमेघ इत्यादींची वर्णने; कालमापनपद्धती, उपकरणे, चरित्रे.

**१८. धातुविज्ञान : १०० पृष्ठे**
व्याप्ती; जलीय धातुविज्ञान, निस्सारण धातुविज्ञान; धातूंचे उष्णता संस्करण, जोडकाम, संरचना, घडवण व परीक्षण; ओतकाम; मिश्रधातू.

**१९. पशुविज्ञान : १५७ पृष्ठे**
पाळीव पशुपक्ष्यांचे संगोपन, संरक्षण, संवर्धन व पैदास; रोगउपचार व प्रतिबंध, गुरे पाळणे, कुक्कुटपालन.

**२०. प्राणिविज्ञान : ५९२ पृष्ठे**
सामान्य माहिती, व्याप्ती, इतिहास, इत्यादी; सर्वसामान्य विषय–शरीरविज्ञान, भ्रूणविज्ञान, परिस्थितिविज्ञान, पुराजीवविज्ञान, विस्तार इत्यादी; प्राण्यांचे वर्णन–भारतीय व भारतेतर, उपयुक्त व महत्त्वाचे, सस्तन, पक्षी, सरीसृप, उभयचर, मासे व अपृष्ठवंशी; पुराप्राणिविज्ञान–गतकालीन महत्त्वाचे प्राणी; प्राण्यांचे वर्गीकरण संघ, वर्ग इत्यादींची नैदानिक लक्षणे व इतर माहितीसह; सैद्धांतिक प्राणिविज्ञान, क्रमविकास, वगैरे; चरित्रे.

**२१. भूविज्ञान : २३८ पृष्ठे**

व्याप्तिलेख, कवचाचे घटक, खनिज विज्ञान, स्फटिक विज्ञान, खनिजांचे वर्णन; खडक-अग्निज, गाळांचे, रूपांतरित; कवचाची रचना, कवचात होणारे फेरफार, अनावरण, निक्षेपण, कवचाच्या हालचाली, आग्नेय क्रिया; भूवैज्ञानिक इतिहास–पृथ्वीचा व भारताचा; भारतातील रचितक; पृथ्वी-अंतरंग, वय, घटक, रचना, तापमान इत्यादी.

**२२. भौतिकी : ६२२ पृष्ठे**

व्याप्तिलेख, मूलतत्त्वे व इतर लेख; आधुनिक भौतिकी–अणुरचना, अणुविघटन, रेडिओॲक्टिव्हिटी, वर्णपट, क्वांटम सिद्धांत, सापेक्षता सिद्धांत इत्यादी; पदार्थांचे गुणधर्म; प्रेरणाविज्ञान; उष्णता, प्रकाश, ध्वनी, विद्युत व चुंबकत्व; चरित्रे.

**२३. मत्स्योद्योग : ४३ पृष्ठे**

व्याप्तिलेख, प्रसार, व्यापारी मास्य उद्योग, इत्यादी; सागरी प्राणिसृष्टी; मत्स्यसंवर्धन, मच्छीमारी पद्धती व हत्यारे; संशोधन, कायदे, क्रीडात्मक मासेमारी इत्यादी.

**२४. रसायनशास्त्र : पृष्ठे ५२२**

व्याख्या, व्याप्ती, इतिहास, मूलतत्त्वे इत्यादी; अकार्बनिक रसायनशास्त्र, कार्बनिक रसायनशास्त्र, भौतिकीय रसायनशास्त्र, विश्लेषणात्मक रसायनशास्त्र; चरित्रे.

**२५. वनस्पतिरोगविज्ञान : २५ पृष्ठे**

व्याप्तिलेख, इतिहास, नामपद्धती इत्यादी; रोग–त्यांची लक्षणे, कारणे, वर्गीकरण व प्रसार, रोगकारक वनस्पती व प्राणी, इत्यादी; रोग व परिस्थिती, रोगांचा अभ्यास व रोग-नियंत्रण.

**२६. वनस्पतिविज्ञान : ५५५ पृष्ठे**

सामान्य माहिती, व्याप्ति, ध्येय, इतिहास इत्यादी (पुरावनस्पति विज्ञानासह); वर्गीकरण–विज्ञान, नामकरण, अभिज्ञान, गट व रूपादर्श, पुरावनस्पति, इत्यादी; आकृति विज्ञान–शारीर, बाह्यांग व अंतर-शारीर; आकारजनन; गर्भविज्ञान; शरीराचे भाग; क्रियाविज्ञान–जीवक्रिया, पुनरुत्पादन, अंकुरण इत्यादी; परिस्थितिविज्ञान–वनश्री, वनस्पतिभूगोल, सहजीवन, परागसिंचन, फल व बीजविकीरण; आर्थिक वनस्पति-विज्ञान–उपयुक्त वनस्पति वर्णन (अन्न, औषधे, तंतू, लाकूड शोभा इत्यादी उपयोगाच्या वनस्पती); विषारी वनस्पती; क्रमविकास, जननशास्त्र, जीवांची उत्पत्ती, संकरण; चरित्रे–प्रसिद्ध वैज्ञानिकांची: संकीर्ण–समुद्री जीवविज्ञान, प्लवक, वनस्पति-कथा, शास्त्रीय उद्याने, वनस्पतिसंग्रह, साधनसामुग्री.

**२७. वातावरणविज्ञान : १५७ पृष्ठे**

वातावरण, जलवायु व हवामान, वायुदाब, तापमान, वायुवेगमापन, सीमाग्र, मेघ, आर्द्रता, वर्षण, वादळ, वारे इत्यादी; वातावरणविज्ञान उपकरणे; वेधशाळा, हवामानाचा अंदाज व पूर्वकथन; वैमानिकीय, नाविक, कृषिविषयक व औद्योगिक वातावरणविज्ञान इत्यादी.

**२८. वैद्यक : ९०० पृष्ठ**

व्याप्ती, इतिहास; शारीर व शरीरक्रिया विज्ञान; आरोग्यविज्ञान व सार्वजनिक आरोग्य; विकृतिविज्ञान, शल्यतंत्र इत्यादी; भेषजविज्ञान, स्त्रीरोगविज्ञान, कायचिकित्सा, विविध चिकित्सा पद्धती, आयुर्वेद; वैद्यकीय शिक्षण संस्था, चरित्रे.

**२९. वैज्ञानिक संस्था : ३७ पृष्ठे**

भारत व परदेशांतील महत्त्वाच्या वैज्ञानिक संस्था.

**३०. संकीर्ण लेख : ४४ पृष्ठे**

विज्ञानेतिहास, तत्त्वज्ञान, प्रयोग, वैज्ञानिक पद्धती, वैज्ञानिक अन्वेषण, विज्ञान व उद्योगधंदे. सायबरनेटिक्स, नियंत्रण पद्धती, पद्धती–अभियांत्रिकी, ऊर्जेची नवीन नैसर्गिक साधने, मानव्य अभियांत्रिकी, इत्यादी.

**३१. संग्रहालये : ३० पृष्ठे**

व्याप्तिलेख; शैक्षणिक, औद्योगिक व कला संग्रहालये.

**३२. सांख्यिकी : १०७ पृष्ठ**

सैद्धांतिक सांख्यिकी, संभाव्यता, वंटन

सिद्धांत, सांख्यिकीय अनुमान, बहुविचरक विश्लेषण, प्रतिदर्श सर्वेक्षण सिद्धांत; अनुप्रयुक्त सांख्यिकी; विमाविषयक, कृषि, जीव, वैद्यकीय, अर्थशास्त्रीय व जनसंख्या सांख्यिकी; सूचकांक, जनगणना, मानसशास्त्र व शिक्षणशास्त्रातील सांख्यिकी पद्धती; सांख्यिकीय गुणनियंत्रण प्रयोगांचा अभिकल्प; कालश्रेणी विश्लेषण.

**३२. सूक्ष्मजीवशास्त्र : ८४ पृष्ठे**

व्याख्या, व्याप्ती; सूक्ष्मजीवशास्त्राच्या शाखा–जंतुशास्त्र; औद्योगिक, शेतीविषयक व वैद्यकीय सूक्ष्मजीवशास्त्र; सूक्ष्मजीवशास्त्राच्या पद्धती, बॅक्टिरियांचे वर्गीकरण, आनुवंशिकी, वाढ, चयापचय, पोषण इत्यादी; प्रतिविरोधके, प्रतिजैविक पदार्थ, जंतुविरोधी पदार्थ.